## घटक ४
## भारतातील बदलता कृषक समाज
(Changing Indian Agrarian Society)

**घटक संरचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठीचे प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

१) ग्रामीण रोजगाराच्या संधी आणि आव्हाने यांचा अभ्यास करता येईल.

२) ग्रामीण पर्यटन, व्याप्ती तसेच महत्त्व समजून घेता येईल.

३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कारणे आणि उपाययोजना अभ्यासता येतील.

## ४.१ प्रस्तावना:–

ग्रामीण समाजातील रोजगाराची समस्या दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करीत आहे. ग्रामीण भागात रोजगारच्या पर्यायी साधनांच्या कमतरतेमुळे ग्रामीण युवकांना पुरेसे शाश्वत आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध होत नाहीत. परिणामी त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण रोजगार निर्मिती तसेच रोजगार प्राप्तीत अनेक आव्हाने आहेत. ग्रामीण भागातील उपब्लध साधनांचे सुयोग्य नियोजन आणि बदलाची मानसिकता ठेवल्यास रोजगारच्या विविध संधी निर्माण करता येऊ शकतील. ग्रामीण पर्यटन या क्षेत्राकडे रोजगार निर्मितीचे क्षेत्र म्हणून पाहता येईल. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शहरी तसेच परदेशी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करून रोजगाराचे नवे पर्याय निर्माण करता येतील. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा ग्रामीण समाजातील ज्वलंत प्रश्न बनला आहे. शेतकरी आत्महत्येच्या विविध कारणांची चर्चा करून या

आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. या सर्व घटकांचा संक्षिप्त अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :–

प्रस्तुत प्रकरणात आपण ग्रामीण रोजगार, ग्रामीण पर्यटन आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या या घटकांचा संक्षिप्त अभ्यास करणार आहोत. ग्रामीण रोजगार या उपविभागात ग्रामीण भागातील उपलब्ध रोजगाराच्या संधींचा आढावा घेऊन ग्रामीण रोजगारासमोरील विविध आव्हानांचा अभ्यास करणार आहोत. दुसऱ्या उपविभागात 'ग्रामीण पर्यटन' या संकल्पनेचा अर्थ, व्याप्ती तसेच रोजगार निर्मितीच्या दृष्टीने ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व जाणून घेणार आहोत. तिसऱ्या उपविभागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या या ज्वलंत सामाजिक समस्येवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विविध कारणांची चर्चा करून या आत्महत्या रोखण्यासाठी विविध पातळीवर कोणत्या उपाययोजना करता येतील यांचाही अभ्यास आपण करणार आहोत.

### ४.२.१ ग्रामीण रोजगार :–

**प्रस्तावना:**

रोजगाराची समस्या सार्वत्रिक स्वरुपाची आहे. आदिवासी, ग्रामीण तसेच शहरी समुदायातील लोकांना पुरेश्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. रोजगार निर्मितीसाठी शासन पातळीवरून विविध उपक्रम तसेच योजना राबवल्या जात आहेत. रोजगार निर्मितीच्या या प्रयत्नांना मात्र अपेक्षित यश मिळताना दिसत नाही. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन रोजगार उपलब्ध होत नाहीत. परिणामी सर्वच समाजातील बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ग्रामीण समाजही याला अपवाद नाही. ग्रामीण समाजातही रोजगाराची समस्या अधिक तीव्र बनलेली आहे. रोजगार तसेच उदरनिर्वाहाची पर्याप्त साधने मिळवताना ग्रामीण लोकांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

ग्रामीण समाजात पुरेसे रोजगार नसल्यामुळे ग्रामीण समाज आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या आजही मागास राहिल्याचे दिसून येते. कृषी क्षेत्रातील समस्या, पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव तसेच अपुरे औद्योगिकीकरण यामुळे ग्रामीण लोकांना रोजगारांच्या पर्याप्त संधी उपलब्ध होत नाहीत. उदरनिर्वाहाची पुरेशी साधने नसल्यामुळे लोकांना दारिद्र्यात जीवन जगावे लागते. ग्रामीण बेरोजगारीवर नियंत्रित ठेवण्यासाठी रोजगारांच्या नव्या पर्यायांचा विचार करणे अपरिहार्य बनले आहे. ग्रामीण समाजातील रोजगारांच्या उपलब्ध संधीचा डोळसपणे विचार करून बेरोजगारीला समर्थपणे तोंड देता येईल. ग्रामीण भागातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा नियोजनबद्ध वापर, बदलाची सकारात्मक मानसिकता तसेच शाश्वत विकास पध्दतीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. कृषी आधारित उद्योगांना प्रोत्साहन, ग्रामीण पर्यटन, लघु व कुटीर उद्योगांची निर्मिती तसेच स्थानिक बाजारपेठांच्या बळकटीकरणातून

रोजगारांच्या विविध संधी प्राप्त होऊ शकतील. ग्रामीण समाजाच्या आर्थिक, सामाजिक तसेच शैक्षणिक प्रगतीला चालना मिळू शकेल. यासाठी ग्रामीण समाजातील उपलब्ध रोजगाराच्या संधी तसेच आव्हाने यांचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे.

**ग्रामीण रोजगाराच्या संधी:**

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे तसेच ग्रामीण समाजातील दारिद्र्य कमी करण्यासाठी रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. अजूनही कृषीक्षेत्र ग्रामीण लोकसंख्येच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख स्त्रोत आहे. परंतु शाश्वत उपजीविकेसाठी केवळ कृषी क्षेत्रातील रोजगारावरतीच अवलंबून राहणे परवडणारे नाही. ग्रामीण रोजगारांच्या विविध संधीसाठी नैसर्गिक साधनसंपत्ती, शेती, शेतीआधारित जोडधंदे, ग्रामीण पर्यावरण, हस्तकला, आरोग्य, ग्रामीण पर्यटन, सामाजिक वनीकरण तसेच माहिती तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांचा रोजगार निर्मितीसाठी विचार करणे आवश्यक आहे. विविध सरकारी उपक्रमांव्दारेही रोजगारच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे शेतीचा हंगाम संपल्यानंतर निर्माण होणारी बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. रोजगार निर्मितीतून ग्रामीण लोकांना उदरनिर्वाहाचे नवे पर्याय उपलब्ध होण्यास चालना मिळेल. ग्रामीण समुदायास आर्थिक स्थैर्य लाभण्यास चालना मिळेल. शहरी भागात मोठ्या प्रमाणात होणाऱ्या स्थलांतरास प्रतिबंध होईल. ग्रामीण समाजातील उपलब्ध घटकांच्या नियोजनबध्द वापरातून ग्रामीण जनतेला उदरनिर्वाहाची विविध साधने उपलब्ध होऊ शकतील. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या कोणकोणत्या संधी प्राप्त होऊ शकतील याचा सविस्तर अभ्यास खालील मुद्यांच्या सहाय्याने करता येईल.

**१) शेती संलग्न उपक्रम:**

पारंपारिक शेती पद्धतीतून पुरेशी रोजगार निर्मिती होत नाही. त्यामुळे सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देऊन सेंद्रिय शेतीशी संबधीत कामातून रोजगार निर्मितीला चालना मिळू शकते. सेंद्रिय उत्पादनांची लागवड करणे, शेतमालावर प्रक्रिया करणे तसेच शेतमालाची खरेदी विक्री यामध्ये काही प्रमाणात रोजगारांची संधी मिळू शकेल. फळे, फुले, भाजीपाला मोठ्या प्रमाणात उत्पादित झाल्यास कापणी, निवडणी, पॅकेजिंग, विक्री तसेच निर्यात करणे यामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. दुग्ध व्यवसाय, दुग्ध प्रक्रिया तसेच दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती व्यवसायात विविध पातळीवर रोजगार निर्माण होतील. ग्रामीण भागात कृत्रिम पद्धतीने केले जाणारे मत्स्यपालन हाही उपजीविकेचा पर्यायी स्त्रोत म्हणून विकसित केला जाऊ शकतो.

**२) कृषी प्रक्रिया उद्योगातील रोजगार संधी:**

ग्रामीण भागातील लोकांना कृषी प्रक्रिया उद्योगातून रोजगारांच्या विविध संधी प्राप्त होऊ शकतात. यामध्ये अन्न प्रक्रिया, शीतगृहे, गोदामे, शेतमाल गुणवत्ता संवर्धन यांचा विचार करता येईल. फळे, भाजीपाला, धान्ये तसेच दुग्धव्यवसायासाठी अन्न प्रक्रिया विभागांची स्थापना करून रोजगार निर्माण होऊ शकतील. भाजीपाला तसेच दुग्धजन्य पदार्थ साठवणुकीसाठी शीतगृहे उभारावी लागतात. शेतमाल साठवणूकीसाठी गोदामांची आवश्यकता असते. या प्रक्रियेत रोजगार निर्मितीला वाव आहे. शेतमाल प्रक्रिया

उद्योगातील मालाच्या गुणवत्ता वाढीमध्ये लोकांना प्रशिक्षित करून रोजगारच्या संधी उपलब्ध करून देता येतील. जॅम, लोणचे, तसेच इतर प्रक्रिया केलेले पदार्थ बनवणे यासारख्या कामामध्ये लोकांना सामावून घेता येईल.

**३) पारंपारिक हस्तकला क्षेत्रातील संधी:**

पारंपारिक हस्तोद्योग, हस्तकला, तसेच ग्रामीण कारागिरांना प्रोत्साहन देऊन रोजगार निर्मितीला चालना देता येईल. विणकाम, मातीची भांडी बनवणे, भरतकाम आणि लाकूडकाम यासारख्या पारंपारिक हस्तकलांचा प्रचार आणि प्रसार करून रोजगार उपलब्ध करता येतील. सहकारी संस्थांच्या माध्यमातून हातमाग क्षेत्राला पाठबळ देऊन तयार होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून दिल्यास रोजगार निर्माण होऊ शकतात. ग्रामीण भागातील कारागिरांचे संघटन उभारून त्यांना बदलत्या काळानुसार व्यवसाय कौशल्ये वाढीसाठी शिक्षण प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ग्रामीण कारागिरांना पुरेसे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून रोजगारांच्या अनेक संधी निर्माण करता येतील.

**४) ग्रामीण पर्यटन क्षेत्रातील रोजगार संधी:**

ग्रामीण पर्यटन क्षेत्रात रोजगारच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतात. ग्रामीण भागात निवासस्थानासाठी निवारा घरे, होमस्टे, विश्रामगृहे यांची उभारणी, त्यांचे व्यवस्थापन तसेच आदरातिथ्य यामध्ये रोजगार प्राप्त होऊ शकतील. स्थानिक संस्कृती, ऐतिहासिक वारसा स्थळांची माहिती पर्यटकांना सांगणे, पर्यटकांना ग्रामीण संस्कृती तसेच नैसर्गिक सौंदर्य दाखवणे यासाठी सहल मार्गदर्शक (टुरिस्ट गाईड) म्हणूनही संधी मिळू शकते. ग्रामीण पर्यटनांतर्गत साहसी पर्यटनाकडे आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून पाहता येईल. यामध्ये ट्रेकिंग, क्लायबिंग, माउंटेनिंग तसेच इको टुरिझम यासारख्या उपक्रमांचा समावेशक करता येईल. अशा विविध माध्यमातून ग्रामीण समाजात रोजगार निर्मिती होऊ शकते.

**५) कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षण:**

ग्रामीण लोकांना कौशल्याच्या अभावामुळे रोजगाराच्या विविध संधीपासून वंचित राहावे लागते. ही बाब लक्षात घेता ग्रामीण भागात उत्तम व्यावसायिक कौशल्ये प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करता येईल. या केंद्रांच्या माध्यमातून सुतारकाम, प्लंबिंग, इलेक्ट्रिकल वर्क, टेलरिंग, मोबाईल रिपेअरिंग तसेच शेअर मार्केट यासारख्या छोट्या मोठ्या व्यवसायांचे ग्रामीण तरुणांना प्रशिक्षण देता येईल. युवकांना व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण मिळाल्यास त्यांना रोजगारांच्या विविध संधी उपलब्ध होतील. ग्रामीण भागातील युवकांमध्ये डिजिटल साक्षरतेला प्रोत्साहन देऊन तरुणांना ऑनलाइन नोकरीच्या संधीची माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल.

**६) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग** (MSME)**:**

ग्रामीण भागात लघु आणि कुटिरोद्योगाच्या माध्यमातून रोजगाराचे ठोस साधन प्राप्त होऊ शकते. यासाठी या उद्योगांना शासन पातळीवरून चालना देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात वस्त्रोद्योग, हस्तकला,

हातमाग, फळ प्रक्रिया तसेच अन्न प्रक्रिया यासारख्या लघु उद्योगांच्या विकासाला पाठबळ देल्यास अनेक लोकांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त होऊ शकेल. ग्रामीण भागातील स्वयं-सहायता गटांसाठी (डक्नः) विविध उत्पन्न प्राप्तीचे उपक्रम राबवून ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवता येईल. ग्रामीण सहकारी संस्थांना सहाय्य करून रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करता येईल.

**७) वनीकरण आणि वन्यजीव संरक्षण:**

मुबलक जंगल, झाडी लाभलेल्या दुर्गम भागात वनीकरण आणि वन्यजीव संरक्षण उपक्रमाकडे रोजगार निर्मितीचे साधन म्हणून पाहता येईल. यामध्ये वनीकरण, वन व्यवस्थापन, वनांचे संरक्षण आणि संवर्धन तसेच शाश्वत वृक्षारोपणाच्या विविध पध्दतीमध्ये स्थानिक लोकांना सामावून घेऊन काही प्रमाणात रोजगार उपलब्ध करता येऊ शकतील. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धनासाठी राबवले जाणारे प्रकल्प तसेच सामाजिक वनीकरणाचे विविध उपक्रम याकडे ग्रामीण समाजातील लोकांनी रोजगार निर्मितीचे क्षेत्र या दृष्टीने पाहायला हवे.

**८) माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT):**

ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना माहिती आणि तंत्रज्ञान साधनांच्या सुयोग्य वापरातून रोजगार निर्मितीचे साधन प्राप्त करता येऊ शकेल. ग्रामीण भागात विविध डिजिटल सेवा पुरवता येतील. शेती संबंधित विविध शासन योजना, शेतमाला संबंधित माहिती, बाजारभाव, खते, बी बियाणे खरेदी, शेती अनुदान माहिती, पीक विमा योजना, सातबारा उतारे तसेच शेतमाल खरेदी विक्री अशा विविध कामांसाठी ग्रामीण लोकांना डिजिटल सेवा पुरवता येईल. ई-कॉमर्स, टेलिमेडिसिन आणि ऑनलाइन शिक्षण यांसारख्या ICT-आधारित सेवा पुरवण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास ग्रामीण युवकांना रोजगाराच्या नवीन संधी प्राप्त होऊ शकतील. ग्रामीण बीपीओ आणि कॉल सेंटर्सची स्थापना करून ग्रामीण सुशिक्षित तरुणांना रोजगाराचे नवे पर्याय उपलब्ध करून देता येतील.

**९) सामाजिक उपक्रमातून रोजगार संधी:**

ग्रामीण भागात शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून शिक्षण आणि आरोग्य सेवा सुधारण्यावर भर देणारे सामाजिक उपक्रम सुरू करता येतील. त्यामुळे ग्रामीण स्त्री पुरुषांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. तसेच पर्यावरणीय समस्यांचे निरकारण करण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी ग्रामीण भागातील कचऱ्याचे व्यवस्थापन करणे, कचऱ्याचा पुनर्वापर करणे, त्यावर प्रक्रिया करणे, कचऱ्यापासून शोभिवंत गृहोपयोगी वस्तू बनवणे इ. स्वरूपाचे व्यवसाय विकसित करता येतील. अशा विविध सामाजिक उपक्रमातून रोजगार निर्मितीस चालना देता येईल.

**१०) पारंपारिक ऊर्जा क्षेत्राच्या विकासातून रोजगार संधी:**

पारंपारिक ऊर्जा निर्मिती क्षेत्राला चालना दिल्यास ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराचे नवे क्षेत्र खुले होईल. यामध्ये सौर ऊर्जा वापरास प्रोत्साहन देणे, सोलर फार्मची निर्मिती करणे, त्याची देखभाल तसेच त्या

संबंधित विविध प्रक्रियांमध्ये रोजगारांची निर्मिती होऊ शकते. ग्रामीण भागात ऊर्जा निर्मितीसाठी बायोगॅस संयंत्रे विकसित करण्याच्या उद्योगाला चालना दिल्यास या माध्यमातूनही काही प्रमाणात रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल.

अशाप्रकारे ग्रामीण लोकांना विविध क्षेत्रात रोजगारच्या निरनिराळ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. यासाठी ग्रामीण भागातील उपलब्ध साधनसंपत्तीचे योग्य नियोजन करणे, शिक्षण, प्रशिक्षण देणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे तसेच ग्रामीण युवकांनी बदलाची मानसिकता ठेवून उपलब्ध रोजगाराच्या संधींचा फायदा घेणे हितकारक ठरणार आहे. रोजगार निर्मितीसाठी सरकारी पाठबळाची आवश्यकता मोठी असणार आहे. असे झाल्यास ग्रामीण लोकांसाठी उदरनिर्वाहाचे अनेक पर्याय खुले होऊन ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक, सामाजिक तसेच शैक्षणिक प्रगती होण्यास मदत होईल.

**ग्रामीण रोजगार प्राप्तीतील आव्हाने :**

ग्रामीण समाजातील लोकांना रोजगारांच्या विविध संधी उपलब्ध होणार असल्या तरी रोजगार किंवा उदरनिर्वाहाची साधने प्राप्त करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. ग्रामीण समाजात पर्याप्त रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे ग्रामीण बेरोजगारीची समस्या तीव्र बनलेली आहे. ग्रामीण लोकांना विविध आव्हानांमुळे रोजगार तसेच उदरनिर्वाहाची साधने प्राप्त करणे कठीण बनले आहे. अपुऱ्या पायाभूत सुविधा, उद्योग तसेच सेवा क्षेत्रांचा मर्यादित विस्तार, ग्रामीण तरुण तसेच कामगारांमध्ये आवश्यक कौशल्ये तसेच प्रशिक्षणाचा अभाव या सर्व कारणांमुळे रोजगारांच्या विविध संधीचा फायदा घेता येत नाही. शेती आधारित लघु उद्योगांकडे दुर्लक्ष, तरुणांचा रोजगार आणि व्यवसायाकडे पाहण्याचा संकुचित दृष्टीकोन यामुळेही रोजगार मिळण्यात अडचणी निर्माण होतात. या विविध कारणांबरोबरच ग्रामीण लोकांना रोजगार प्राप्ती करण्यात कोणकोणत्या आव्हानांचा सामना करावा लागतो याचा सविस्तर अभ्यास खालील मुद्यांच्या सहाय्याने करता येईल.

**१) शेतीचे हंगामी स्वरूप:**

भारतीय शेती हंगामी स्वरुपाची आहे. शेती ही पावसाच्या पाण्यावर आणि निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील बहुतांशी जमीन कोरडवाहू स्वरुपाची आहे. पुरेश्या जलसिंचन सुविधांच्या अभावामुळे शेतीला पर्याप्त पाणी पुरवठा होत नाही. सततचे दुष्काळ, जमिनीची नापिकता, परंपरागत शेती तंत्रज्ञान, भांडवलाची कमतरता, वीज टंचाई अशा अनेक कारणांमुळे शेतीत बारमाही पिके घेता येत नाहीत. शेतीतील नांगरणी, पेरणी, खुरपणी, कापणी अशी कामे ठराविक हंगामातच असतात. त्यामुळे शेतमजुरांना हंगामाच्या दिवसातच काम मिळते. शेतीच्या हंगामी स्वरूपामुळे ग्रामीण लोकांना ५ ते ६ महिने रोजगाराविना राहावे लागते. शेतीतून पुरेश्या रोजगाराची निर्मिती होत नसल्यामुळे रोजगार मिळण्यात लोकांना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे शेती हंगाम वगळता इतर काळात ग्रामीण लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे आव्हान मोठे आहे.

### २) औद्योगिकरणाचा अभाव:

भारतात औद्योगिकरणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाले. शहरी भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण घडून आले आहे. ग्रामीण भागात मात्र औद्योगिकरणास पुरेशी चालना मिळाली नाही. ग्रामीण भागातील औद्यागिक प्रगती मर्यादितच राहिली. मर्यादित औद्योगिक विकासामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली नाही. उदरनिर्वाहासाठी पूर्णपणे शेतीवर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण लोकसंख्येला पर्याप्त रोजगार उपलब्ध न झाल्यामुळे ग्रामीण बेरोजगारीत वाढ होत गेली. ग्रामीण भागातील औद्योगिकरणाची गती मंद राहिल्यामुळे ग्रामीण रोजगारीसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील औद्योगिकरणाला चालना देण्याचे आव्हान मोठे आहे.

### ३) जमिनीचे तुकडेकरण:

ग्रामीण भागातील शेतीचे कालानुरूप तुकडेकरण झालेले आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी हे अल्पभूधारक आणि भूमिहीन आहेत. लहान शेतीतून मिळणारे उत्पन्न तुटपुंजे असते. यावरच लोकांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. अशा प्रकारच्या शेतीतून निर्माण होणारा रोजगारही हंगामी स्वरूपाचा असतो. लोकांना उदरनिर्वाहासाठी इतरत्र रोजगार शोधावा लागतो. मिळेल ते काम करावे लागते. लहान आणि खंडित शेतीमुळे शेतीची उत्पादकता कमी होते. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचे ठोस साधन उपलब्ध होत नाही. अल्प भूधारकतेमुळे ग्रामीण लोकांना वर्षातून अनेक महिने बेरोजगारीचे जीवन जगावे लागते. जमिनीच्या तुकडेकरणामुळे नवीन रोजगार निर्माण होत नसल्यामुळे रोजगार मिळवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो आहे. ग्रामीण शेत जमिनीचे होत जाणारे तुकडेकरण रोजगार प्राप्तीतील मोठेच आव्हान बनले आहे.

### ४) वाढती लोकसंख्या:

ग्रामीण तसेच शहरी लोकांच्या रोजगारासमोरील प्रमुख आव्हान म्हणजे देशाची वाढती लोकसंख्या होय. १९५१ साली ३६.१ कोटी असणारी देशाची लोकसंख्या आज जवळपास १४५ कोटी झालेली आहे. देशाचा लोकसंख्या वाढीचा दर १.६४ टक्के इतका आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १७.५ टक्के लोक भारतात राहतात. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा पहिला क्रमांक लागतो. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात देशात रोजगार निर्मिती होत नाही. नवीन उद्योगधंद्यांची निर्मिती होत नाहीत. रोजगारांच्या संधीही कमी प्रमाणातच उपलब्ध होतात. वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासाला खीळ बसते. वाढत्या लोकसंख्येमुळे ग्रामीण लोकांना रोजगार मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. पुरेश्या रोजगार प्राप्तीसाठी वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याचे मोठे आव्हान ग्रामीण समाजासमोर आहे.

### ५) तांत्रिक कौशल्याचा अभाव:

ग्रामीण लोकांच्याकडे तांत्रिक कौशल्याचा अभाव असल्याने रोजगार मिळवताना अनेक अडचण येतात. ग्रामीण भागात उद्योगधंदा, नोकरी अथवा स्वयंरोजगार यासाठी आवश्यक तांत्रिक कौशल्ये पुरवणाऱ्या

संस्थांचा अभाव असतो. विविध तांत्रिक कौशल्ये शिकण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना शहरात जावे लागते. यासाठी पुरेसा वेळ, आवश्यक पैसा तसेच शहरात येऊन राहण्याची मानसिकता प्रत्येक ग्रामीण व्यक्तीकडे असतेच असे नाही. त्यामुळे अशा व्यक्तींना व्यवसाय किंवा नोकरीसाठी आवश्यक कौशल्ये प्राप्त करता येत नाहीत. तांत्रिक कौशल्याच्या अभावामुळे ग्रामीण लोकांना रोजगारापासून वंचित राहावे लागते. रोजगार प्राप्तीसाठी आवश्यक तांत्रिक कौशल्याचा अभाव कसा दूर करावा हे मोठेच आव्हान आहे.

**६) सदोष शिक्षणव्यवस्था:**

पारंपारिक शिक्षणातील व्यावहारिक शिक्षणाच्या अभावामुळे नोकरी तसेच व्यवसायासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास होत नाही. उच्च शिक्षण घेऊनही व्यक्तीला रोजगार प्राप्त होत नाही. उद्योग, व्यवसाय किंवा रोजगार निर्मितीस चालना देण्यास प्रचलित शिक्षण पद्धती असमर्थ ठरत आहे. प्रचलित शिक्षण व्यवस्था व्यक्तीच्या अंगी निर्णयक्षमता, धाडस, स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती तसेच नवीन क्षेत्रात कर्तृत्व करण्याची उर्मी या गुणांचा विकास करण्यात असमर्थ ठरत आहे. नोकरीसाठीच शिक्षण अशी मानसिकता बनली आहे. शिक्षणातून श्रमाचे महत्त्व कमी झाले आहे. पारंपारिक शिक्षण व्यक्तीला स्वावलंबी बनवण्यात अपयशी ठरत आहे. सदोष शिक्षणव्यवस्था रोजगार प्राप्तीतील आव्हान बनली आहे. पारंपारिक शिक्षण व्यवस्थेतील दोष दूर करून रोजगार प्राप्तीसाठी आवश्यक सक्षम शिक्षण प्रणाली निर्माण करण्याचे आव्हान आहे.

**७) शेतीक्षेत्रातील मागासलेपणा:**

भारत आजही कृषिप्रधान देश म्हणूनच ओळखला जातो. देशातील बहुसंख्य लोक शेती आणि शेती आधारित व्यवसाय करतात. आजही शेती पारंपारिक आणि मागास पद्धतीनेच केली जाते. आधुनिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. परिणामी कृषिक्षेत्राचे स्वरूप मागास आणि अविकसित राहिल्याचे दिसून येते. जलसिंचनाच्या पारंपारिक पद्धती, अप्रगत शेती तंत्रज्ञान, अवजारे, पाण्याचा तसेच खतांच्या भरमसाठ वापर, यामुळे घटलेली शेतीची उत्पादकता, चुकीची पिक पद्धती तसेच जमिनीची नापिकता या विविध कारणांमुळे शेती क्षेत्र मागास राहिलेले आहे. शेतीतून फक्त उदरनिर्वाहापुरते उत्पादन मिळते. शेतीतून नवीन रोजगार निर्मिती होत नाही. शेतीवर आधारित असणाऱ्या लोकांना पुरेसा उदरनिर्वाह प्राप्त करता येत नाही. त्यामुळे पर्याप्त रोजगार प्राप्तीसाठी शेती क्षेत्रातील मागासलेपण कमी करण्याचे आव्हान सर्वांसमोर आहे.

**८) व्यक्तिगत कारणे:**

लोकांची आळशी वृत्ती, श्रमाला प्रतिष्ठा न देणे, कामाबाबत उदासीनता, व्यक्तिगत नैराश्य, शारीरिक अपंगत्व तसेच मानसिक दौर्बल्य या सारख्या वैयक्तिक कारणांमुळे संबंधित व्यक्तीला रोजगार उपलब्ध होत नाही. कामाचा अनुभव नसणे, विशिष्ट काम करण्यास पात्र नसणे, कौशल्याचा अभाव, उद्योजकतेचा अभाव, योग्य मार्गदर्शनाची कमतरता तसेच वाढलेले वय अशा अनेक व्यक्तिगत कारणांमुळेही ग्रामीण भागातील लोकांना रोजगार प्राप्ती होत नाही. गरीब परिस्थितीमुळे आवश्यक शिक्षण प्रशिक्षण घेता न

आल्यामुळेही व्यक्तीला रोजगाराच्या पुरेशा संधी मिळत नाहीत. अंगी गुणवत्ता असूनही नोकरी न मिळाल्यामुळे नैराश्यातून बेरोजगार राहिलेले तरूणही ग्रामीण भागात पाहायला मिळतात. ग्रामीण समाजातील लोकांच्या विविध व्यक्तिगत कारणांमुळे त्यांना रोजगारापासून वंचित राहावे लागते. रोजगार प्राप्तीत व्यक्तिगत कारणेही आव्हान निर्माण करतात.

**९) भौगोलिक गतीशिलतेचा अभाव:**

गतिशीलतेच्या अभावामुळे ग्रामीण तरुणांना पुरेश्या रोजगाराच्या संधी मिळत नाहीत. अनेक रोजगारक्षम तरुण आपले गाव, जमीन, कुटुंब, नातलग, राहण्याचे ठिकाण सोडून शहरात किंवा अन्यत्र ठिकाणी जाण्यास उत्सुक नसतात. तरुणांना गावच्या शेजारी किंवा जवळपास रोजगार हवा असतो. त्यांना आपल्या भागातच नोकरी अथवा रोजगार मिळेलच असे नाही. रोजगार उपलब्ध असलेल्या ठिकाणी जाण्याची मानसिकता नसल्यामुळे ग्रामीण तरुण रोजगारापासून वंचित राहतात. अनेक तरुणांची नोकरीसाठी गावातून महानगरात जाण्याची मानसिकता नसल्यामुळे नोकरीच्या चांगल्या संधी गमवाव्या लागतात. भौगोलिक गतीशिलतेच्या अभावामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध असूनही लोक बेरोजगार राहतात. ग्रामीण लोकांच्यात असलेला भौगोलिक गतीशिलतेचा अभाव हे रोजगार प्राप्तीतील एक आव्हान आहे.

**१०) ग्रामीण उद्योगधंद्यांचा ऱ्हास:**

औद्योगिक क्रांतीचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम घडून आले. देशात कारखाना उत्पादन पद्धतीची सुरुवात झाली. वस्तूंचे उत्पादन यंत्रांच्या सहाय्याने होऊ लागले. त्यामुळे ग्रामीण भागातील हस्तोद्योग, घरगुती उत्पादन पद्धती, हातमाग, अलुतेदारी तसेच बलुतेदारी पद्धती संपुष्टात आली. या सर्वांवर अवलंबून असलेले ग्रामीण भागातील हजारो कारागीर बेरोजगार झाले. पर्यायी रोजगारांची निर्मिती करणारी नवी व्यवस्था उभी राहू शकली नाही. बेरोजगार झालेल्या ग्रामीण कारागिरांनी मोठ्या प्रमाणात शहरांकडे स्थलांतर केले. औद्योगीकरणामुळे शहरांचा विकास झाला. ग्रामीण समाज मात्र मागासच राहिला. ग्रामीण उद्योगांच्या ऱ्हासामुळे रोजगार प्राप्तीत मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**११) मंद आर्थिक विकास:**

देशाचा मंद आर्थिक विकास ग्रामीण रोजगारीसमोरील आव्हान आहे. देशाचा आर्थिक विकास दर कमी राहिलेला आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात विकास दर वाढलेला नाही. आर्थिक विकासाचा फायदा काही मुठभर श्रीमंत लोकांनाच झालेला आहे. ग्रामीण भाग आर्थिक विकासाच्या बाबतीत मागासच राहिलेला आहे. अपुऱ्या आर्थिक विकासामुळे ग्रामीण भागात पर्याप्त रोजगार निर्मिती होत नाही. परिणामी ग्रामीण भागात लोकांना रोजगार मिळण्यात अनेक अडचणी येतात. अपुऱ्या रोजगारामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत जाते. जलसिंचन सुविधांची कमतरता, पायाभूत सुविधांचा अभाव आणि शेतीचे हंगामी स्वरूप यामुळेही ग्रामीण भागात पुरेशी रोजगार प्राप्ती होत नाही. देशातील आर्थिक विकासाची मंद गती रोजगार निर्मिती तसेच रोजगार प्राप्तीसमोरील आव्हान बनली आहे.

### १२) लिंग विषमता:

ग्रामीण भागातील लिंग विषमता रोजगारीसमोरील आव्हान आहे. ग्रामीण महिलांवरील कठोर सामाजिक बंधने, शिक्षणाचा अभाव, अपुरी संसाधने आणि संधींचा अभाव यामुळे त्यांना रोजगाराच्या संधीपासून वंचित राहावे लागते. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांनी आजही पारंपारिक भूमिकाच पार पाडण्याची अपेक्षा केली जाते. महिलांनी उच्च शिक्षित व्हावे तसेच व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण घेऊन अर्थार्जन करावे या गोष्टीं दुय्यम मानल्या जातात. कामाच्या ठिकाणाची असुरक्षितता, स्त्री पुरुष भेदभाव, नोकरीचे ठिकाण दूर असणे तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या अशा विविध कारणांमुळे महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. ग्रामीण भागात असलेली लिंग विषमता महिलांना रोजगार प्राप्त करण्यात आव्हानात्मक परिस्थिती निर्माण करते.

### १३) दारिद्रय:

ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक परिस्थिती रोजगार प्राप्तीत अनेक अडचणी निर्माण करते. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे ग्रामीण लोकांच्याकडे आवश्यक साधनसंपत्तीची कमतरता असते. दारिद्र्यामुळे व्यक्तीला व्यवसायभिमुख वा कौशल्याधिष्ठित शिक्षण घेता येत नाही. पैशाच्या अभावामुळे स्वयंरोजगार अथवा इतर व्यवसाय सुरु करता येत नाही. परिणामी व्यक्तीला उदरनिर्वाहाच्या साधनांची प्राप्ती करता येत नाही. व्यक्तीचे दारिद्र्य हे सुद्धा रोजगार प्राप्तीतील प्रमुख आव्हान म्हणून सांगता येईल.

वरील आव्हानांबरोबरच युवकांचा कामाप्रतीचा नकारात्मक दृष्टिकोन, व्यवसाय तसेच रोजगाराकडे पाहण्याची संकुचित मनोवृत्ती, एकत्र कुटुंब पद्धती तसेच जातीआधारित समाजरचना अशा विविध आव्हानांमुळे ग्रामीण समाजातील लोकांना पर्याप्त रोजगार उपलब्ध होत नाहीत. उपरोक्त आव्हानांचा अथवा अडचणींचा काळजीपूर्वक विचार करून त्यावरील ठोस उपाययोजनांच्या माध्यमातून रोजगार प्राप्तीसाठी ग्रामीण समाजात पोषक वातावरण निर्माण करता येईल.

## २) ग्रामीण पर्यटन: व्याप्ती आणि महत्त्व

ग्रामीण पर्यटनाचा विस्तार झपाट्याने होत आहे. ग्रामीण पर्यटनाला जगभरातून पंसती मिळत आहे. रोजगार निर्मितीचे क्षेत्र म्हणून ग्रामीण पर्यटनाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागाला विपुल नैसर्गिक सौंदर्य, जैवविविधता, ऐतिहासिक, प्राचीन वारसा, धार्मिक स्थळे, वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण जीवनशैली, ग्रामीण संस्कृती, हस्तकला तसेच संगीत यांचे वैविध्य लाभलेले आहे. या घटकांच्या माध्यमातून नागरी पर्यटकांना रोजच्या धकाधकीच्या जीवनातून अल्प खर्चात मनोरंजन आणि आनंद मिळवून देण्यासाठी राबवण्यात येणारे पर्यटन म्हणजे 'ग्रामीण पर्यटन' होय. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शहरी लोकांना ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव घेता येईल. ग्रामीण लोकांना उत्पन्नाचे एक साधन प्राप्त होईल. ग्रामीण समाजातील विविध वैशिष्ट्यांचे सुयोग्य नियोजनातून शहरी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करता येईल. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण समाजाच्या विकासास चालना मिळू शकेल. त्यामुळे या संकल्पनेचा अभ्यास

करणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ग्रामीण पर्यटनाची संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी याच्या काही व्याख्या पाहता येतील.

**ग्रामीण पर्यटनाच्या व्याख्या:**

१. **बर्नार्ड लेन :**

''ग्रामीण पर्यटन हे ग्रामीण भागात होणारे पर्यटन आहे, जे पर्यटकांना ग्रामीण वातावरण, स्थानिक संस्कृती आणि पारंपरिक उपक्रमांना अनुभव देते.''

२. **ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को–ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट** (OECD)

''ग्रामीण पर्यटन म्हणजे असे पर्यटन जे ग्रामीण भागात घडते आणि जेथे शेतकरी आणि ग्रामीण लोक विविध सेवा, उपक्रम आणि सुविधा प्रदान करतात जेणेकरून पर्यटकांना त्या ठिकाणी आकर्षिक करता येईल.

३. **लेस्ली रॉबर्ट्स आणि डेरेक हॉल :**

''ग्रामीण पर्यटन हे ग्रामीण भागातील पर्यटनास चालना देऊन स्थानिक समुदायाला आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक फायदे देते, तसेच सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा जपण्यास मदत करते.''

४. **ॲना गॅनन :**

''ग्रामीण पर्यटन ही पर्यटनाची एक अशी शाखा आहे, जी पर्यटकांना कृषी आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव घेण्याची संधी देते. याचा पर्यटक व स्थानिक समुदाय या दोघांनाही फायदा होतो.''

५. **रिचर्ड शार्पले आणि जेननेट शार्पले :**

''ग्रामीण पर्यटनामध्ये ग्रामीण भागातील पर्यटन उपक्रमांचा समावेश होतो. असे उपक्रम पर्यटक आणि स्थानिक समाज यांच्यातील परस्परसंवाद वाढवतात तसेच ग्रामीण विकासाला हातभार लावतात.''

वरील सर्व व्याख्या ग्रामीण पर्यटनाच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकतात.

ग्रामीण पर्यटनाकडे ग्रामीण समाजाच्या प्रगतीचा मार्ग म्हणून पाहता येईल. यामध्ये ग्रामीण समाज हे पर्यटन स्थळ असेल तर शहरी लोक हे पर्यटक असतील. ग्रामीण भागातील वैशिष्ट्यपूर्ण घटकांच्या वापरातून पर्यटकांना आनंद देता येईल. त्यांचे मनोरंजन करता येईल. ग्राम संस्कृती, ग्राम रचना, घरांची रचना, मातीची कौलारू घरे, जीवनपद्धती, ग्रामीण बोली, आहारपद्धती, रूढी, प्रथा, परंपरा, धार्मिक व्रतवैकल्ये, सण, समारंभ, यात्रा, जत्रा, कला, हस्तकला, मंदिरे, गुरेढोरे, पारंपारिक व्यवसाय, लोकांच्यातील सामाजिक संबंध, आपुलकी, प्रेम तसेच आदरातिथ्य अशा विविध गोष्टींची विविधता असते. ग्रामीण समाजातील विविध घटकांच्या सहाय्याने ग्रामीण जीवनातील आनंद मिळवण्याच्या उद्देशातून ग्रामीण पर्यटन या संकल्पनाचा उगम झालेला दिसून येतो.

आधुनिक जीवन धकाधकीचे आणि तणावपूर्ण बनलेले आहे. शहरी जीवनात एक प्रकारची कृत्रिमता आलेली आहे. शहरी जीवनातील कामाचा ताण, चिंता, वैफल्य, एकटेपणा आणि निराशा यामुळे व्यक्तीची मानसिक शांतता भंग पावलेली आहे. शारीरिक तसेच मानसिक आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी लोकांना पर्यटनाची गरज भासू लागली आहे. गर्दी, गोंगाट, कोलाहल तसेच अशांतता यापासून दूर शांत निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटन करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. यासाठी ग्रामीण पर्यटन हा उत्तम पर्याय ठरत आहे. ग्रामीण पर्यटनाची संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप आणि प्रकार पाहता येतील.

**ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप:**

ग्रामीण भागातील उपलब्ध घटकांच्या माध्यमातून आणि ग्रामीण लोकांच्या दैनंदिन जीवनातील घडामोडीमध्ये सामील होऊन ग्रामीण पर्यटनातील आंनद मिळवायचा असतो. यामध्ये शेतीतील छोट्या मोठ्या कामात सहभागी होणे, शेतात झुणका भाकर खाणे, रानावनात भटकंती करणे, बैलगाडीतून फेरफटका मारणे, नदी अथवा विहिरीत पोहण्याचा आनंद घेणे, गायी म्हैशींचे दूध काढणे, ग्रामीण जेवणाचा आस्वाद घेणे, हुरडा पार्टी करणे, स्थानिक पोशाख परिधान करणे, सण उत्सवात सहभागी होणे, ग्रामीण संगीत, कला या सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेणे यांचा समावेश होतो. याचबरोबर मासेमारी, डोंगर चढाई, जंगल सफारी, गावातील प्राचीन ऐतिहासिक, धार्मिक ठिकाणांना भेटी देणे, स्थानिक हस्तकला वस्तूंची खरेदी करणे अपेक्षित आहे. ग्रामीण पर्यटना अंतर्गत ग्रामीण लोकांनी आपले दैनंदिन जीवन, निवासस्थान, शेती परिसर यांचे नीटनेटके सादरीकरण करून शहरी पर्यटकांना आनंदाचा अनुभव घेण्यासाठी या गोष्टी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ग्रामीण पर्यटन हे कमी भांडवलात ग्रामीण लोकांना आर्थिक उत्पन्न मिळवून देण्याचे साधन म्हणून पाहता येईल. ग्रामीण पर्यटनाचे प्रकार थोडक्यात पाहू.

**१) कृषी पर्यटन:**

आपल्या शेतीचा काही भाग जाणीवपूर्वक पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करणे म्हणजे कृषी पर्यटन होय. निसर्ग, शेतकरी, शेतीपूरक व्यवसाय, शेतीशी निगडीत विविध कामे, शेतकऱ्यांची जीवनपद्धती या विषयीच्या कुतूहलापोटी शेतकऱ्यांच्या शेतीला भेट देणे, शेतीसंबंधित बाबी जाणून घेण्यासाठी त्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन आनंद मिळवण्याच्या हेतूने केलेले पर्यटन म्हणजे कृषी पर्यटन होय. यामध्ये पर्यटक शेतीतील विविध कामांचा अनुभव घेऊ शकतात. उदा. पेरणी, कापणी, गायी तसेच म्हैशीचे दुध काढणे, फळांच्या हंगामात फळे तोडणे, पॅकेजिंग करणे, सेंद्रिय शेती सहलीत सहभागी होणे. इ. गोष्टी कृषी पर्यटना अंतर्गत करता येतील.

**२) सांस्कृतिक पर्यटन:**

सांस्कृतिक पर्यटना अंतर्गत ग्रामीण भागातील डोंगर दऱ्या, जंगल, घनदाट झाडी, स्थानिक चालीरीती, रूढी, प्रथा, परंपरा, सण, समारंभ यांचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांना आकर्षित करता येईल. यामध्ये मातीपासून विविध वस्तू तयार करणे, विणकाम, भरतकाम यासारख्या हस्तकला कार्यशाळांचे आयोजन करून

याव्दारे सांस्कृतिक पर्यटनामध्ये शहरी लोकांना सहभागी करून घेता येईल. याचबरोबर ग्रामीण भागातील प्राचीन मंदिरे, वारसा स्थळे, धार्मिक, ऐतिहासिक स्मारके तसेच इतर प्रेक्षणीय स्थळांना सांस्कृतिक पर्यटना अंतर्गत भेटी देता येतील.

**३) पर्यावरण पर्यटन:**

भारतातील अनेक खेडयांना जंगल, झाडी आणि सुंदर निसर्ग लाभलेला आहे. आजकाल बहुतांशी पर्यटक अशा पर्यटन स्थळांना भेट देणे पसंत करतात. या पर्यटना अंतर्गत पर्यटकांना वन्यजीव सफारी, पक्षी निरीक्षण आणि निसर्गाशी निगडीत अनेक गोष्टी करता येतील. लोकांना नैसगिक आनंद उपभोगता येईल. इको फ्रेंडली तसेच सेंद्रिय शेतीतील निवासस्थानात राहणे, स्थानिक जैवविविधता जाणून घेणे, वनस्पती, प्राणी तसेच पक्षी यांची माहिती घेणे, ग्रामीण भाग तसेच निसर्ग संवर्धन प्रकल्पामध्ये पर्यटकांना सहभागी करून घेता येईल. यामुळे ग्रामीण पर्यटनाला चालना मिळेल.

**४) साहसी पर्यटन:**

ग्रामीण भागात साहसी पर्यटनाला मोठा वाव आहे. बहुतांशी ग्रामीण भाग हा डोंगर दऱ्या, नद्या, नाले, नैसर्गिक धबधबे, झरे तसेच छोट्या मोठ्या टेकड्यांनी वेढलेला आहे. ग्रामीण भागात ट्रेकिंग, हायकिंग, माउंटनिंग, बायकिंग हे साहसी खेळ खेळण्यास पोषक वातावरण आहे. पर्यटकांसाठी निसर्गाच्या सान्निध्यात विविध साहसी शिबिरांचे आयोजन करता येईल. नद्या आणि तलाव असलेल्या ग्रामीण भागात नदीवरील राफ्टींग, मासेमारी तसेच इतर जलक्रीडा करता येतील. डोंगर दऱ्या असणाऱ्या भागात रॉक क्लाइंबिंग, रॅपलिंग आणि इतर साहसी खेळांचा अनुभव घेण्यासाठी साहसी पर्यटन उपयुक्त होईल.

**५) होमस्टे आणि ग्रामीण रिसॉर्ट्स:**

ग्रामीण भागात होमस्टेच्या माध्यमातून स्थानिक कुटुंबासोबत राहून निखळ ग्रामीण जीवनाचा अनुभव घेता येईल. पर्यावरणाच्या सानिध्यात निसर्गाचे जतन करत ग्रामीण रिसॉर्ट्स उभे करून त्यामध्ये आधुनिक तसेच पारंपारिक ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव घेता येईल. यामध्ये स्थानिक पाककला, विविध खाद्यपदार्थ तसेच आहार पध्दती चाखण्याची संधी पर्यटकांना देता येईल. स्थानिक भागातील पारंपारिक स्वयंपाक शिकण्याची संधीही याव्दारे उपलब्ध करून देता येईल.

**६) आरोग्य पर्यटन:**

ग्रामीण भागाकडे आरोग्य पर्यटनाचे केंद्र म्हणून पाहता येईल. नैसर्गिक आणि शांत वातावरणामध्ये मन:शांतीसाठी प्रसन्न वातावरण उपलब्ध असते. अशा वातावरणात योगा शिबिरे, ध्यानधारणा शिबिरे तसेच आयुर्वेदिक उपचार केंद्रे सुरु करून शहरी लोकांना आकर्षित करता येईल. धकाधकीच्या जीवनातून काही काळ तणावरहित जगण्याचा अनुभव घेण्यासाठी आरोग्य पर्यटन फायदेशीर ठरू शकेल. नैसर्गिक उपचार आणि पारंपारिक आरोग्य पध्दतीवर आधारित विविध उपक्रम राबवता येतील. निसर्गाच्या सान्निध्यात चालणे,

शरीराचे शिथलीकरण (रिलॅक्ससेशन), नैसर्गिक आहार, शुद्ध हवा तसेच आरोग्य संवर्धनासाठी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबवून आरोग्य पर्यटनाला चालना देता येईल.

**७) समुदाय आधारित पर्यटन:**

ग्रामीण समुदायाच्या संवर्धनासाठी जे विविध उपक्रम राबवले जातात त्यामध्ये शहरी लोकांना सहभागी करून घेण्यासाठी समुदाय आधारित पर्यटनाचा उपयोग करता येईल. यामध्ये गावातील शाळा बांधणे, विहिरी, बंधारे तसेच इतर पायाभूत सुविधांची निर्मिती यासारख्या सामुदायिक प्रकल्पामध्ये पर्यटकांना सहभागी करून घेण्यासाठी प्रोत्साहित करता येईल. ग्राम पातळीवरील स्थानिक प्रशासन तसेच सामुदायिक निर्णय प्रक्रियेचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांना समुदाय आधारित पर्यटना अंतर्गत सामावून घेता येईल.

**८) शैक्षणिक पर्यटन:**

ग्रामीण भागाकडे शैक्षणिक पर्यटनच्या दृष्टिकोनातूनही पाहता येईल. शैक्षणिक पर्यटना अंतर्गत कृषी विकास, ग्रामीण विकास आणि पारंपारिक हस्तकला यांना प्राधान्य देऊन विविध अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करता येईल. ग्रामीण जीवन आणि शाश्वत जीवन पध्दतीविषयी अनुभवात्मक शिक्षण घेण्यासाठी शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहलींचे आयोजन करता येऊ शकते. ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरणशास्त्र, ग्रामीण वारसा तसेच ग्रामीण समाजाशी निगडीत विविध विषयांच्या अनुषंगाने कार्यशाळा, चर्चासत्रे तसेच परिषदा यांचे आयोजन करून शैक्षणिक पर्यटनाकडे पर्यटकांचे लक्ष वेधता येईल.

**ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती:**

ग्रामीण पर्यटनात ग्रामीण समाजाला निसर्गत: लाभलेल्या वैशिष्ट्यांचा नियोजनबद्ध उपयोग करणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागातील सामाजिक, नैसर्गिक, भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच पर्यावरणीय घटकांचा ग्रामीण समाजाच्या विकासासाठी प्रभावीपणे वापर करून ग्रामीण पर्यटनाचा विस्तार करता येईल. ग्रामीण पर्यटनामध्ये ग्रामीण समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच पर्यावरणीय विकासाची क्षमता आहे. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण लोकांना उत्पन्नाचे ठोस साधन प्राप्त होण्यास मदत होईल. ग्रामीण समाजाच्या विकासाला हातभार लागेल. या दृष्टिकोनातून ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती व्यापक आहे. ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती खालील मुद्यांच्या सहाय्याने समजून घेता येईल.

**१) निसर्गत: उपलब्ध घटकांचा उपयोग:**

ग्रामीण समाजाला मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती लाभलेली आहे. यामध्ये ग्रामीण भागातील शेती, शेती आधारित जोडधंदे, जंगल, झाडी, डोंगर दऱ्या, नद्या, नाले, तलाव, नैसर्गिक झरे, समुद्रकिनारे, पाळीव तसेच वन्य प्राणी, शुद्ध हवा, नैसर्गिक सौंदर्य, शांत तसेच निवांत वातावरण या निसर्गत: लाभलेल्या वैविध्यपूर्ण घटकांचा ग्रामीण पर्यटनासाठी उपयोग करून घेता येईल. उपलब्ध नैसर्गिक घटकांचा नियोजनबद्ध वापर करणे ग्रामीण पर्यटनात अपेक्षित आहे. उपलब्ध घटकांच्या सुयोग्य वापरातून ग्रामीण पर्यटनाचा विकास करता येऊ शकतो. त्यामुळे रोजगार निर्मितीलाही चालना मिळू शकते.

**२) ग्रामीण पर्यटनाची आर्थिक क्षमता:**

ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी ग्रामीण पर्यटनामध्ये अधिक क्षमता आहे. पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करून स्थानिक वस्तू आणि सेवांची मागणी निर्माण होते. स्थानिक बाजारपेठेचे बळकटीकरण होण्यास चालना मिळते. लघु उद्योजकांना उद्योग स्थापनेस प्रोत्साहन मिळून निवास, रेस्टॉरंट्, वाहतूक, हस्तकला तसेच विविध क्षेत्रात आर्थिक उलाढाल होते. लोकांना उत्पन्नाचे विविध स्त्रोत निर्माण होतात. लोकांची क्रयशक्ती वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान होण्यास मदत होते. स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतात. पर्यटनातून वाढलेल्या उत्पन्नामुळे चांगले शिक्षण, आरोग्यसेवा, वाहतूक, दळणवळण आणि मूलभूत सुविधांच्या वाढीला चालना मिळते. पायाभूत विकासामुळे ग्रामीण भागातील रहिवाशांचे जीवनमान सुधारून समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होते.

**३) ग्रामीण पर्यटनाची सामाजिक क्षमता:**

ग्रामीण पर्यटन हे सामाजिक सामंजस्य आणि सामुदायिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन आहे. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून विविध पार्श्वभूमीतील पर्यटक एकत्र येऊन त्यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाणीला चालना मिळते. स्थानिक लोकांना पर्यटकांशी संवाद साधण्याची संधी प्राप्त होते. स्थानिक लोकांची सामाजिक कौशल्ये आणि आत्मविश्वास वाढून त्यांचा दृष्टिकोन व्यापक होण्यास मदत होते. पर्यटनामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी सांस्कृतिक वारसा जतन करून पारंपारिक कला, हस्तकला आणि रीतिरिवाजांचे पुनरुज्जीवन होण्यास प्रोत्साहन मिळते. ग्रामीण पर्यटनामध्ये महिलांनाही रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. लैंगिक समानता तसेच महिला सक्षमीकरणास चालना मिळते. स्थानिकांचे जीवनमान सुधारून सामाजिक विकासाला हातभार लागतो.

**४) ग्रामीण पर्यटनाची पर्यावरणीय क्षमता:**

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासात ग्रामीण पर्यटन मोलाची भूमिका पार पाडू शकते. ग्रामीण पर्यटन ग्रामीण भागातील नैसर्गिक सौंदर्य तसेच जैवविविधता या संसाधनांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याबद्दल जागरूकता निर्माण करू शकते. पर्यटकांना निसर्गाच्या सान्निध्यात राहायला आवडते. जगण्याची पर्यावरणपूरक पद्धती आणि शाश्वत पर्यटनास पर्यटकांची पसंती असते. सामाजिक वनीकरण, वन्यजीव संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रण यासारख्या पर्यावरण संरक्षण प्रकल्पांमध्ये पर्यटकांना सहभागी करून घेता येऊ शकते. पर्यटन उपक्रमांमध्ये स्थानिकांना सहभागी केल्यामुळे पर्यावरणाप्रती जबाबदारीची भावना वाढीस लागण्यास मदत होते. पर्यटन आणि पर्यावरण यांच्यातील सहसंबंधातून ग्रामीण समुदायांसाठी शाश्वत भविष्य निर्माण होण्यास मदत होईल. नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षण आणि संवर्धना बरोबरच उदरनिर्वाहाचे शाश्वत मार्ग उपलब्ध होऊ शकतात.

**५) ग्रामीण समाजाच्या विकासास सहाय्यकारी:**

ग्रामीण समाजाच्या विकासासाठी अनेक प्रयत्न झाले आहेत. विविध कारणांमुळे आजही ग्रामीण समाजाचा पुरेसा विकास होऊ शकलेला नाही. परिणामी ग्रामीण समाजात विविध समस्या निर्माण झालेल्या

आहेत. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला चालना मिळू शकते. ग्रामीण पर्यटनाव्दारे ग्रामीण जनतेला आवश्यक रोजगार तसेच उत्पन्नाचे साधन प्राप्त होईल. यासाठी सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यामातून ग्रामीण समाजात पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून उपलब्ध साधनसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन, नियोजन तसेच प्रसार करून ग्रामीण समाजाचा विकास साधता येईल.

**६) कमी खर्चिक स्वरूप:**

शहरी पर्यटनाच्या तुलनेत ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप कमी खर्चिक आहे. शहरी पर्यटनाचा खर्च सर्वसामान्य लोकांना परवडत नाही. शहरी पर्यटनाचा प्रवास, राहणे, खाणेपिणे, हॉटेलिंग, शॉपिंग तसेच इतर सोयी सुविधांचे दर अवाढव्य असतात. सर्वसामान्य लोकांना ते परवडत नाहीत. अशा ठिकाणी पर्यटनासाठी जाणे खूपच खर्चिक असते. परिणामी अनेक लोकांना पुरेशा पैशाअभावी नाईलाजास्तव अशा ठिकाणी जाणे टाळावे लागते. अशा पर्यटकांना शहरी पर्यटनाचा आनंद घेता येत नाही. त्या तुलनेत ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप कमी खर्चिक आहे. अगदी अल्प खर्चात ग्रामीण पर्यटनाचा आनंद घेता येईल. ग्रामीण भागातील प्रेक्षणीय ठिकाणे पाहता येतील. कमी खर्चात ग्रामीण जीवन पध्दतीची अनुभूती घेण्याची संधी सर्वच स्तरातील पर्यटकांनाही प्राप्त होईल.

**७) कुटुंबाच्या मनोरंजनाचे ठिकाण:**

ग्रामीण पर्यटन संपूर्ण कुटुंबाच्या मनोरंजनाचे उत्तम ठिकाण ठरू शकते. शहरी तसेच इतर ठिकाणी कुटुंबासोबत पर्यटन करताना विविध गोष्टींचा त्रास होत असतो. सहकुटुंब आनंद घेताना विविध कारणांमुळे अडथळ्यांचा सामना करावा लागतो. गुंडागर्दी, व्यसनी तरुणांची टोळकी, बीभत्सपणा तसेच अनैतिक गोष्टी इ. गोष्टींमुळे कुटुंबासोबत निखळ आनंद घेता येत नाही. ग्रामीण भागात या सर्व गोष्टीवर सामाजिक नियंत्रण असते. विशिष्ट मर्यादेत राहूनच मनोरंजनाचा आस्वाद घ्यावा लागतो. ग्रामीण पर्यटनात संपूर्ण कुटुंबाला ग्रामीण कला, क्रिडा, यात्रा, सण, उत्सव, शिवार भटकंती, निवारा तसेच पोहणे या सर्व गोष्टींचा मनसोक्त आनंद घेता येईल. शहरी लोक आपल्या कुटुंबाच्या मनोरंजनासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी ग्रामीण पर्यटनाकडे आकर्षित होतील.

**८) शांत आणि निवांत ठिकाण:**

ग्रामीण समाज अजूनही शहरी गोंगाट आणि अशांततेपासून दूर आहे. शहरातील धावपळीचे जीवन, वाढती स्पर्धा, त्यातून येणारे ताणतणाव, वाहतूक कोंडी तसेच विविध प्रदूषणांमुळे शहरी लोकांचे मानसिक आरोग्य आणि शांतता हरवत चालली आहे. काही काळ तरी आनंद उपभोगता यावा, काम करण्यासाठी ऊर्जा प्राप्त व्हावी तसेच मानसिक ताणतणाव कमी व्हावेत यासाठी शहरी पर्यटकांना शांतता आणि निवांतपणाची गरज भासत असते. ही गरज ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकते. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून मानसिक शांतता आणि निवांतपणा अनुभवण्यासाठी शहरी पर्यटकांना आकर्षित करता येऊ शकेल.

### ९) ग्रामीण जीवन पद्धतीचे आकर्षण:

ग्रामीण जीवनपद्धती वैशिष्ट्यपूर्ण आहे. निसर्गाशी जवळीक साधणारे साध्या पद्धतीचे शेती आधारित जीवन, वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, आहार, सण, उत्सव, भाषा, पेहराव, परस्परातील आपुलकी, जिव्हाळा तसेच प्रेम या सर्वच गोष्टींमुळे ग्रामीण लोक इतरांपेक्षा वेगळे ठरतात. अशा जीवन पद्धतीचे अप्रूप आणि आकर्षण नागरी तसेच परदेशी लोकांना अधिक असते. शहरातील धकाधकीच्या व्यस्त जीवनशैलीचा कंटाळा आलेल्या लोकांना ग्रामीण समाजाचा सहवास हवाहवासा वाटतो. किमान काही काळ तरी शांत आणि निवांत जगण्याचा अनुभव घेण्यासाठी लोक उत्सुक असतात. अशा लोकांसाठी ग्रामीण पर्यटन हा उत्तम पर्याय होऊ शकतो.

### १०) ग्रामीण संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन:

विविध कारणांच्या माध्यमातून ग्रामीण लोकांचा शहरी समाजाशी संपर्क वाढलेला आहे. ग्रामीण समाजात शहरी संस्कृतीच्या प्रभावातून अनेक चांगले वाईट परिणाम घडून येत आहेत. शहरी संस्कृतीच्या आक्रमणामुळे ग्रामीण संस्कृतीतील वेगळेपण संपुष्टात येत चालले आहे. ग्रामीण समाजाचे मूळ स्वरूपच लुप्त होत चालले आहे. वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण संस्कृती भारतीय समाजाची ओळख आहे. ग्रामीण पर्यटनात ग्रामीण संस्कृती ही शहरी पर्यटकांच्या आकर्षणाचे मुख्य केंद्रबिंदू असणार आहे. ग्रामीण संस्कृती संवर्धनातून लोकांना उदरनिर्वाह प्राप्त होणार असल्यामुळे त्याचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे ग्रामीण लोकांसाठी अत्यावश्यक असणार आहे. त्यामुळे ग्रामीण संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास चालना मिळू शकते.

### ११) स्थानिक वस्तुमालास बाजारपेठ:

ग्रामीण लोक लघु तसेच कुटिरोद्योगाच्या माध्यमातून विविध हस्तकलेच्या वस्तू तयार करीत असतात. या वस्तू विक्रीच्या उत्पन्नातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. त्यांच्या वस्तूंची विक्री स्थानिक बाजारपेठेत होत असते. ग्रामीण बाजारपेठ मर्यादित असल्यामुळे त्यांना पुरेशी उत्पन्न प्राप्ती होत नाही. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण वस्तूंना चांगली बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. शहरी तसेच परदेशी पर्यटकाना ग्रामीण वस्तूंचे आकर्षण असते. अशा पर्यटकांना ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण बाजारपेठेकडे आकर्षित करता येईल. यामुळे स्थानिक उत्पादनांना चांगली बाजारपेठ उपलब्ध होऊन ग्रामीण लोकांना आर्थिक उत्पन्नाचा ठोस पर्याय उपलब्ध होईल.

### १२) बेरोजगारी नियंत्रण:

ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण समाजातील लोकांना रोजगारच्या विविध संधी उपलब्ध होतील. तरुणांना स्वयंरोजगार करण्यास प्रोत्साहन मिळेल. बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल. रोजगार निर्मितीतून उत्पन्न प्राप्ती होण्यास मदत होईल. पात्रता असूनही काम नसल्यामुळे बेरोजगारीचे जीवन वाट्याला आलेल्या अनेक ग्रामीण युवकांना उदरनिर्वाहाचे निश्चित साधन प्राप्त होईल. ग्रामीण बेरोजगारीवर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल. गावातच रोजगारांची उपलब्धता झाल्यामुळे ग्रामीण भागातून शहराकडे होणाऱ्या स्थलांतराला काही प्रमाणात आळा बसेल.

**ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व:**

ग्रामीण पर्यटन ग्रामीण समाजातील लोकांसाठी रोजगार तसेच उत्पन्नाचे विविध पर्याय निर्माण करण्यात मोलाची भूमिका पार पाडू शकते. ग्रामीण समाजाच्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते. भविष्यातील रोजगार निर्मिती तसेच ग्रामीण समाजाच्या विकासात ग्रामीण पर्यटनाचे महत्व अधिक असणार आहे. खालील मुद्यांच्या सहाय्याने ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व विस्तृत स्वरुपात अभ्यासता येईल.

**१) ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन:**

ग्रामीण पर्यटन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम करते. पर्यटकांची वाढती संख्या स्थानिक उत्पादन आणि सेवांना चालना देते. हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि वाहतूक सुविधा यांसारख्या क्षेत्रांना चालना मिळते. तसेच हस्तकला, शेती उत्पादने इत्यादींची मागणी वाढते. लघु उद्योगांना चालना मिळते. पर्यटनामुळे रोजगार वाढून ग्रामीण लोक उद्योगधंद्याकडे वळू शकतात. स्थानिक उत्पादने आणि वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध होईल. ग्रामीण पर्यटनाव्दारे ग्रामीण लोकांना उत्पन्नाचे विविध स्त्रोत प्राप्त होतील. लोकांना उत्पन्नाचे निश्चित साधन प्राप्त झाल्यामुळे आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यास मदत होईल. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होण्यास हातभार लागेल. ग्रामीण पर्यटनामुळे ग्रामीण समाजाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल.

**२) ग्रामीण रोजगाराच्या संधी:**

ग्रामीण पर्यटनामुळे विविध प्रकारच्या रोजगार निर्मितीस चालना मिळेल. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून आदरातिथ्य, वाहतूक, टूरिस्ट गाईड, मार्गदर्शक, वाहतूक, हस्तकला, खानपान तसेच स्थानिक बाजारपेठा यासारख्या विविध क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. याचबरोबर पर्यटनपूरक स्वयंरोजगार सुरु करण्यास आवश्यक पोषक परिस्थिती निर्माण होण्यास मदत होईल. स्थानिक भागात रोजगार निर्मिती झाल्यामुळे ग्रामीण भागातच लोकांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त होईल. परिणामी शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतराला काही प्रमाणात आळा बसेल.

**३) समुदाय विकास:**

ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण लोकांना आर्थिक उत्पन्नाचे ठोस साधन प्राप्त होईल. पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळू शकेल. ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. ग्रामीण लोकांना रोजगार, उत्तम शिक्षण तसेच आरोग्यसेवा उपलब्ध होतील. ग्रामीण लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक पोषक वातावरण निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळेल. ग्रामीण पर्यटना अंतर्गत महिला तसेच उपेक्षित घटकांना रोजगार तसेच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. स्त्री सक्षमीकरणास पाठबळ मिळेल. ग्रामीण लोकांच्या आर्थिक तसेच सामाजिक उन्नतीची प्रक्रिया गतिमान होऊन समुदाय विकासाला चालना मिळेल.

### ४) सांस्कृतिक संरक्षण आणि संवर्धन:

ग्रामीण संस्कृती ही ग्रामीण समाजाचे खास वैशिष्ट्य आहे. शहरी समाजाच्या अनिष्ट प्रभावामुळे ग्रामीण समाजाचे हे वैशिष्ट्य नष्ट होत चालले आहे. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होईल. ग्रामीण पारंपारिक कला, क्रिडा, संगीत, नृत्य, भाषा, पोशाख, सण, समारंभ तसेच आहारपद्धती ही सांस्कृतिक विविधता जपण्याचे आणि त्याचे पुरुज्जीवन करण्याचे काम ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून होऊ शकेल. याचबरोबर स्थानिक समुदाय तसेच देशी विदेशी पर्यटकांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण वाढीस लागेल. यातून परस्परांच्या संस्कृतीचा आदर आणि समजूतदारपणा वाढण्यास प्रोत्साहन मिळेल. स्थानिक संस्कृतीचा प्रसार आणि प्रचार होण्यास उत्तेजना मिळेल.

### ५) पायाभूत सुविधांचा विकास:

शहरी तसेच परदेशी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करण्यासाठी ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा उत्तम असणे आवश्यक आहे. पर्यटकांचा ग्रामीण पर्यटनाचा हेतू सफल होण्यासाठी ग्रामीण भागात उत्तम दर्जाचे रस्ते, स्वच्छता, शुद्ध पाणी, अखंडित वीज तसेच संपर्क माध्यमे उत्तम दर्जाची असावी लागतात. यामुळे पर्यटकांना पर्यटनाचा आनंद मनसोक्त आणि विना अडथळा घेता येईल. ग्रामीण पर्यटनाचे क्षेत्र विकसित करण्यासाठी पायाभूत सोयी सुविधांची पुरेशी उपलब्धता असणे ही पूर्व अट आहे. उत्तम पायाभूत सुविधांमुळे स्थानिक रहिवाशांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास होण्यास हातभार लागेल.

### ६) पर्यावरण संवर्धन:

ग्रामीण पर्यटनामध्ये शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, इको टुरिझम, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन यावर भर दिला जातो. ग्रामीण पर्यटनाच्या विकासामध्ये ग्रामीण भागातील धार्मिक, ऐतिहासिक स्थळे, नद्या, नाले, नैसर्गिक झरे, डोंगर दऱ्या यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. या माध्यमातून स्थानिकांना रोजगार व उत्पन्न प्राप्ती होणार आहे. ग्रामीण भागातील उपलब्ध नैसर्गिक घटकांच्या नियोजनबध्द विकासातून पर्यावरणाला हनी न पोचवता ग्रामीण पर्यटनाला चालना दिली जाते. त्यामुळे ग्रामीण पर्यटन स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांमध्ये पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि जागरुकता निर्माण करण्यात मोलाची भूमिका पार पाडू शकते.

### ७) शेती विकासाला चालना:

ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शेतीच्या विकासाला हातभार लागेल. ग्रामीण पर्यटनामध्ये शेती, शेतीपूरक जोडधंदे, शेत शिवारातील भटकंती, सेंद्रिय शेतीतील भाजीपाला, जेवण, निवारा यासारखे घटक केंद्रस्थानी असणार आहेत. शहरी तसेच परदेशी पर्यटकांना ग्रामीण शेती आणि शेतीशी निगडीत विविध जोडधंदे यासंबंधी आकर्षण असते. त्यामुळे ग्रामीण पर्यटनाच्या भरभराटीसाठी शेती विकासाला प्राधान्य देणे आवश्यक असणार आहे. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण शेती सुधारणेला चालना मिळेल.

**८) शहरी स्थलांतरास प्रतिबंध :**

ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारच्या विविध संधी निर्माण होतील. ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारास प्रोत्साहन मिळेल. लोकांना गावातच उदरनिर्वाहाची साधने प्राप्त होतील. रोजगाराचे विभिन्न स्त्रोत गावातच उपलब्ध झाल्यामुळे शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतरास काही प्रमाणात प्रतिबंध होईल. स्थलांतरामुळे होत असलेले ग्रामीण कुटुंबाचे विस्थापन तसेच विघटन थांबण्यास मदत होईल. ग्रामीण समाजातील आपुलकी, प्रेम आणि एकात्मता टिकून राहण्यास उत्तेजना मिळेल.

**९) स्थानिक बाजारपेठेचे बळकटीकरण:**

ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक कारागीर तसेच उत्पादकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल. स्थानिक व्यवसायांना चालना मिळू शकेल. शहरी पर्यटकांना ग्रामीण कलाकुसरीच्या वस्तूंचे आकर्षण असते. शेतकरी तसेच कारागिरांना स्थानिक बाजारपेठेत लघु आणि कुटिरोद्योगातून बनवलेल्या वस्तू पर्यटकांना विकता येऊ शकतील. स्थानिक उत्पादनांच्या प्रचार आणि प्रसारास चालना मिळेल. स्थानिक उत्पादने आणि सेवांची मागणी वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळेल. परिणामी स्थानिक बाजारपेठेच्या बळकटीकरणास हातभार लागेल.

**१०) शैक्षणिक संधी:**

ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शहरी तसेच परदेशी पर्यटकांना ग्रामीण जीवनशैली, जीवनविषयक तत्वज्ञान, शेती पध्दती, कला, हस्तकला तसेच स्थानिक परंपरा याबद्दल माहिती प्राप्त होईल. ग्रामीण लोकांचे जीवनविषयक अनुभव प्रत्यक्ष जाणून घेता येतील. ग्रामीण लोकांच्या जगण्यातील काही अनुभव पर्यटकांना जीवन जगण्यास प्रेरक ठरतील. स्थानिक लोक आणि पर्यटक यांच्यात ज्ञान, अनुभव तसेच कौशल्यांची देवाणघेवाण घडून येईल. स्थानिक लोकांना याचा फायदा होईल. यामुळे ग्रामीण पर्यटन, शेती पध्दती, आदरातिथ्य तसेच इतर सेवांचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

**११) ग्रामीण लोकांच्या आत्मविश्वासात वाढ:**

ग्रामीण पर्यटनातून ग्रामीण लोकांच्या आत्मविश्वास वाढीस चालना मिळते. लोकांचा राहणीमानाचा दर्जा सुधारण्यास मदत होते. स्थानिक लोक त्यांची संस्कृती आणि वारसा पर्यटकांना दाखवतील. यामुळे समुदायातील लोकांच्यात अभिमानाची तसेच एकात्मतेची भावना वाढीस लागण्यास हातभार लागतो. स्थानिकांच्यात आर्थिक स्वातंत्र्याची भावना निर्माण होते. ग्रामीण लोकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास चालना मिळते. ग्रामीण समुदायाची प्रतिमा सुधारण्यास मदत होते. पायाभूत सुविधांचा विकास झाल्यामुळे संपूर्ण समुदायाला फायदा होतो. पर्यटकांशी संवाद साधण्यातून स्थानिकांचा दृष्टिकोन व्यापक बनण्यास मदत होते. स्थानिक लोक प्रशासन आणि विकासात्मक उपक्रमांमध्ये आत्मविश्वासाने सहभागी होतात. स्त्रियांना रोजगार प्राप्त होऊन त्या स्वावलंबी बनण्यास प्रोत्साहन मिळते.

**१२) खेड्यांच्या औद्योगिकीकरणास चालना:**

ग्रामीण पर्यटनातून खेड्यांच्या औद्योगिकीकरणाला चालना मिळते. स्थानिक वस्तू आणि सेवांची मागणी वाढल्यामुळे लघु उद्योगांत वाढ होते. स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होते. पर्यटकांच्या अन्न, पेये आणि हस्तकला इ. गोष्टींच्या पूर्ततेसाठी प्रक्रिया उद्योग स्थापन होतात. हॉटेल, रेस्टॉरंट आणि वाहतूक इ. सुविधांच्या विकासासाठी बांधकाम सामग्री, उपकरणे आणि इतर औद्योगिक उत्पादनांची मागणी वाढते. कौशल्ययुक्त कामगारांची मागणी वाढते. व्यावसायिक प्रशिक्षण संस्था तसेच कौशल्य विकास कार्यक्रम विकसित होतात. स्थानिकांमध्ये उद्योजकतेची भावना वाढीस लागण्यास चालना मिळते. पर्यटन क्षेत्रातील यश औद्योगिक क्षेत्रात उद्योजक बनण्यासाठी लोकांना प्रेरित करते. पर्यटन आणि औद्योगिकीकरण यांच्यातील परस्परसंबंधामुळे खेड्यांच्या औद्योगिकीकरणास चालना मिळते.

ग्रामीण पर्यटन ग्रामीण लोकांचे जीवनमान सुधारणे तसेच ग्रामीण बेरोजगारीवर नियंत्रण ठेवण्याचा महत्त्वपूर्ण पर्याय होऊ शकते. स्थानिक हस्तकला, शेती पद्धती, ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन, पर्यावरण संरक्षण तसेच ग्रामीण संस्कृतीचे जतन करण्यात ग्रामीण पर्यटन महत्त्वपूर्ण ठरेल. ग्रामीण समाजाच्या समाजिक आर्थिक विकासात ग्रामीण पर्यटन मोलाची भूमिका निभावू शकते. पुढील काळातील ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व ओळखून ग्रामीण लोकांनी त्याअनुषंगाने वाटचाल करणे हिताचे ठरणार आहे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या:–**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समाजाला जातो. परंतु आज शेती व्यवस्था भीषण वास्तवाशी झगडत आहे. देशात तसेच महाराष्ट्रात दरवर्षी हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेती व्यवस्थेची झालेली दुरवस्था, शेतकऱ्यांसमोरील आर्थिक आव्हाने, शेतकऱ्यांचा वाढता कर्जबाजारीपणा, बदलत्या हवामानाचा फटका, शेतजमिनीची नापिकता तसेच सामाजिक पाठिंब्याचा अभाव यामुळे असहाय झालेला शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत. शेतकरी आत्महत्येने कुटुंब, समाज आणि देशाचे कायमस्वरूपी नुकसान होत आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे कुटुंब कोलमडून पडत आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना आर्थिक, सामाजिक, मानसिक तसेच राजकीय कारणे जबाबदार आहेत. या आत्महत्या रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे संपूर्ण समाजाची गरज आहे. शेतीपूरक धोरणांची काटेकोर अंमलबजावणी करून शेतकऱ्यांसाठी आश्वासक परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात काही प्रमाणात यश प्राप्त होऊ शकते. 'आत्महत्येची' संकल्पना समजून घेण्यासाठी खालील काही विचारवंतांच्या आत्महत्येसंदर्भातील व्याख्या उपयुक्त ठरतील. त्या पुढीलप्रमाणे–

**आत्महत्येची व्याख्या:**

**१) एमिल दुर्खीम:**

'ज्या कृतीचा शेवट आत्मनाश किंवा मृत्यूमध्ये होतो अशी व्यक्तीकडून घडणारी होकारात्मक वा नकारात्मक किंवा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कृती म्हणजे आत्महत्या होय.'

२) **ब्रिटानिका शब्दकोश:**

'आत्महत्या ही व्यक्तीने समजून, उमजून आणि स्वच्छेने केलेली आत्महननाची क्रिया आहे.'

३) **सुधाताई काळदाते:**

'व्यक्ती ज्यावेळी स्वत:हून स्वत:चे आयुष्य संपवून टाकते ती घटना आत्महत्या ठरते.'

वरील व्याख्यांच्या आधार घेता असे म्हणता येते की आत्महत्त्या ही स्वतःचे आयुष्य स्वतःच संपवणारी क्रिया आहे.

पाश्च्यात समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीम यांनी सर्वप्रथम आत्महत्येचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे. दुर्खीमने १८९७ मध्ये 'Lee Suicide' या ग्रंथामध्ये 'आत्महत्या ही सामाजिक घटना मानली असून आत्महत्येस व्यक्ती स्वत: जबाबदार नसून समाज जबाबदार असतो' असा सिध्दांत मांडलेला आहे. दुर्खीमने आत्महत्येचे अहंवादी, परार्थवादी, आत्मकेंद्रित आणि दैववादी असे प्रकार सांगितले आहेत. दुर्खीमने आत्महत्येस व्यक्तिगत कारणांपेक्षा सामाजिक परिस्थिती जबाबदार असल्याचे स्पष्ट केले. दुर्खीमच्या सिद्धांतानुसार व्यक्ती आर्थिक, सामाजिक, जैविक, मानसिक, वांशिक, तसेच राजकीय कारणांमुळे आत्महत्या करते. शेतकऱ्यांची आत्महत्या ही व्यक्तिगत बाब नसून सामाजिक आहे हे स्पष्ट होते. शेतकरी आत्महत्येस 'प्रमाणक शून्य' आत्महत्या संबोधता येईल.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येची सद्यस्थिती:**

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (NCRB) च्या आकडेवारीनुसार १९९५ ते २०१४ या काळात तब्बल २,९६,४६८ तर २०१४ ते २०२२ मध्ये एकूण १,००,४७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. २०२२ च्या आकडेवारीनुसार भारतात सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात झालेल्या आहेत. महाराष्ट्रा पाठोपाठ कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू आणि मध्यप्रदेश राज्यात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. २०२२ मध्ये राज्यात २८५१ शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केलेल्या आहेत. २०२२ मध्ये २९४२ तर २०२१ मध्ये २७२३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. २०२३ मध्ये महाराष्ट्रातील मराठवाड्यात आठ जिल्ह्यांमध्ये एकूण १०८८ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपवलेले आहे. बीडमध्ये सर्वाधिक २६९, संभाजीनगरमध्ये १८२, नांदेडमध्ये १७५ तर धाराशिवमध्ये १७१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. देशातील शेतकऱ्यांच्या एकूण आत्महत्यापैकी ३८% आत्महत्या फक्त महाराष्ट्रात झालेल्या आहेत. आर्थिक, सामाजिक तसेच राजकीयदृष्ट्या संपन्न असणाऱ्या आपल्या राज्यासाठी ही बाब शोभनीय नाही. वरील आकडेवारी कृषी क्षेत्रावरील संकट अधिक गंभीर झाल्याचे दर्शविते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही सामाजिक समस्या बनलेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येस अनेक कारणे जबाबदार आहेत. या कारणांचा अभ्यास करणे अत्यावश्यक बनले आहे. ही कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

**शेतकरी आत्महत्येस जबाबदार कारणे:**

**१) कर्जबाजारीपणा:**

शेतकऱ्याला शेतीसाठी विविध अवजारे, यंत्रे, बी-बियाणे, रासायनिक खते तसेच कीटकनाशके खरेदीसाठी पैशाची गरज असते. यासाठी त्याच्याकडे पुरेसे भांडवल नसते. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना अनेकदा बँका, सहकारी संस्था तसेच खासगी सावकारांकडून भरमसाठ व्याजाने कर्ज काढावे लागते. दुष्काळ, नापिकी तसेच इतर कारणांमुळे शेतीतून पुरसे उत्पादन होत नाही. शेतीत नुकसान झाल्यामुळे घेतलेल्या कर्जाची परतफेड करता येत नाही. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होतो. वाढत्या कर्जबाजारीपणामुळे कुटुंबातल्या कमवत्या पुरुषावर दडपण येते. कर्जबाजारीपणाला कंटाळून निराश झालेला शेतकरी शेवटी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो.

**२) शेतजमिनीची असमान विभागणी किंवा तुकडेकरण :**

भारतातील शेत जमिनीची विभागांनी असमान झालेली आहे. बडे जमीनदार, मध्यम, अल्पभूधारक तसेच भूमिहीन शेतमजूर यांच्यामध्ये जमिनीचे वाटप असमान पद्धतीने झालेले आहे. मुठभर जमीनदारांकडे शेत जमिनीचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणात झालेले आहे. मध्यम तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. अधिक जमीन असणाऱ्या जमीनदारांची आर्थिक परिस्थिती भक्कम असते. शेतजमिनीचे तुकडेकरण झाल्यामुळे अल्पभूधारक किंवा शेतमजुरांना शेती करणे परवडत नाही. शेतीतून त्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नाही. अशा शेतीतून मिळणारे उत्पन्न हे वार्षिक किंवा सहामाही असते. अनेक शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी भूमिहीन शेतमजूर म्हणून काम करावे लागते. अनेक शेतकऱ्यांना कुटुंबाच्या मूलभूत गरजांचीही पूर्तता करता येत नाही. त्यांना गरिबीत जीवन जगावे लागते. हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे असे अल्पभूधारक शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

**३) वाढती लोकसंख्या:**

भारत लोकसंख्येच्या बाबतीत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. देशाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. शेतीवर लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शेतीतून पुरेसे रोजगारही निर्माण होत नाहीत. दिवसेंदिवस शेतजमिनीचे तुकडेकरण होत आहे. लोकसंख्येचे प्रमाण वेगाने वाढत असले तरी शेतजमीन मात्र दिवसेंदिवस घटत चालली आहे. लहान होत चाललेल्या मर्यादित शेतजमिनीतून शेती उत्पादनही दिवसेंदिवस घटत चालले आहे. वाढत्या लोकसंख्येच्या अतिरिक्त ताणामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होऊन शेतकरी आत्महत्याग्रस्त होत आहेत.

**४) शेतीचा वाढता उत्पादन खर्च:**

शेतीचा उत्पादन खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही. शेतीची मशागत करणे, बी बियाणे, शेतीपयोगी यंत्र अवजारे, रासायनिक खते, किटकनाशके यांच्या अवाढव्य किंमतीमुळे शेतीचा उत्पादन खर्च शेतकऱ्याच्या आवाक्या बाहेर गेलेला आहे. पेरणी, खुरपणी, मळणी तसेच शेतीच्या इतर कामासाठी शेतमजुरांना अधिक

मजुरी देऊन शेती करावी लागते. हा खर्च करण्याची शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती नसते. प्रसंगी यासाठी कर्ज काढावे लागते. खर्चाच्या प्रमाणात शेतीतून उत्पन्न मिळत नाही. खर्च अधिक आणि उत्पन कमी अशी शेतीची अवस्था झाली आहे. शेतकऱ्याला खर्च आणि उत्पन्नाचा ताळमेळ साधता येत नाही. प्रचंड आर्थिक नुकसानीमुळे शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती खालावत जाऊन शेतकरी आत्महत्येकडे वळतो आहे.

**५) सततची नापिकी:**

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना सततच्या नापिकीस सामोरे जावे लागत आहे. हवामानातील बदल, अतिवृष्टी, गारपीट, पिकावरील रोगांचा प्रादुर्भाव, कोरडा दुष्काळ, पाण्याची कमतरता यामुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी संकटात सापडतो. शेतीतून पुरेसे उत्पादन न झाल्यामुळे शेतकरी हवालदिल होतो. सततच्या नापिकीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेडही करू शकत नाही. सर्वच परिस्थितीतून हतबल झालेला शेतकरी आत्महत्येकडे वळतो.

**६) सिंचन सोयींचा अभाव:**

पाणीपुरवठ्याच्या सोयींची मुबलक उपलब्धता असलेल्या प्रदेशात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा दर कमी आहे. प्रगत जलसिंचन सुविधांमुळे शेतीतून चांगले पीक घेता येते. याउलट सिंचन सोयींच्या अभावामुळे चांगली पिके घेता येत नाहीत. पाण्याच्या कमतरतेमुळे शेती नापीक बनते. पुरेसे उत्पादन होत नसल्यामुळे उत्पन्न प्राप्तीही होत नाही. अशा ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रात बहुतांशी आत्महत्या या विदर्भ आणि मराठवाड्यात झालेल्या आहेत. हा भाग दुष्काळी आणि पाण्याचे दुर्भिक्ष असलेला आहे. पश्चिम महाराष्ट्र किंवा कोकण या ठिकाणी आत्महत्येचे प्रमाण नगण्य आहे. याचे मुख्य कारण म्हणजे पाण्याची मुबलक उपलब्धता आणि जलसिंचनाच्या सोयीसुविधा होय. जलसिंचन सुविधांचा अभाव शेतकऱ्यांच्या आत्महत्येस महत्त्वपूर्ण कारण ठरत आहेत.

**७) शेतकऱ्यांचे अज्ञान:**

कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित पीक पद्धती, लागवडीच्या पद्धती, सुधारित बी बियाणे, खते, कीटकनाशके तसेच माती परीक्षण अशा शेती संबंधित गोष्टींविषयी बऱ्याच शेतकऱ्यांना माहिती असत नाही. अनेक शेतकरी शेतीतील आधुनिक बदलाविषयी अनभिज्ञ असतात. आजही बहुतांशी शेतकरी मागास तसेच पारंपारिक माहितीच्या आधारे शेती करताना दिसून येतात. परिणामी अशा शेतीतून शेतकऱ्यांना पुरेसे उत्पादन मिळत नाही. शेतीचा उत्पादन खर्च वाढत जाऊन शेती तोट्याचा व्यवहार बनते. शेतीविषयक अज्ञानातून होणाऱ्या नुकसानीमुळे शेतकरी आत्महत्येकडे वळतो.

**८) शेतमालाला कमी भाव:**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळत नाही. शेतकऱ्याने परिश्रमाने पिकवलेला शेतमाल कवडीमोल भावाने विकावा लागतो. शेतमाल विक्रीतून उत्पादन खर्चही निघत नाही. यामुळे शेतकऱ्यांचे

प्रचंड आर्थिक नुकसान होते. मध्यस्थ, दलाल तसेच व्यापारी शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. शेतकऱ्यांकडून कमी किमतीत खरेदी केलेला माल चढ्या भावाने विकतात. त्यामुळे शेतकऱ्याला मिळणारे उत्पन्न दलाल तसेच व्यापाऱ्यांना मिळते. शेतमालाची किमान आधारभूत किंमत निश्चित नसल्यामुळे शेतकरी वर्गाची आर्थिक पिळवणूक होते. शेतमालाच्या किमती मात्र वर्षानुवर्षे कमीच राहिलेल्या आहेत. यामुळे शेतकऱ्याला तोटा होऊन त्याची आर्थिक स्थिती हलाखीची बनते. शेतकऱ्याच्या दारिद्र्यात वाढ होऊन तो आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो.

**९) शेती पूरक जोडधंद्यांचा अभाव:**

शेतीत पायाभूत गोष्टींची कमतरता असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय करता येत नाहीत. शेती आधारित प्रक्रिया उद्योगांच्या कमतरतेमुळे अन्य मार्गाने उत्पन्न प्राप्ती होत नाही. शेतीतून मिळणारे उत्पन्न तुटपुंजे असते. शेतकऱ्याला दारिद्र्यात जीवन कंठावे लागते. शेतमाल नाशवंत असतो. फळे, भाजीपाला, दुध, काजू, फुले इ. माल जास्त काळ टिकत नाही. गोदामांची व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्याला शेतमालाची साठवणूक करता येत नाही. शेतमाल वेळेत बाजारपेठेत नाही पाठवल्यास खराब होतो. त्यामुळे शेतकऱ्याला मिळेल त्या किमतीला तोटा सहन करून शेतमाल विकावा लागतो. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत होऊन आत्महत्येकडे वळतो.

**१०) सामाजिक रूढी, प्रथा व परंपरा:**

भारतीय समाजावर अनेक अनिष्ट रूढी, प्रथा परंपरांचा पगडा आहे. शेतकरीही याला अपवाद नाही. अनेक शेतकरी कर्जे काढून लग्न, सण, समारंभ, जत्रा, यात्रा, धार्मिक विधी, कर्मकांडे तसेच व्रतवैकल्ये मोठ्या प्रमाणात साजरे करतात. समाजातील खोट्या प्रतिष्ठेसाठी भरमसाठ व्याजाने कर्जे काढून मोठी घर बांधणे, गाड्या घेणे तसेच इतर अनावश्यक गोष्टींवर पैसे खर्च केले जातात. कर्जातील पैसा अनुत्पादक गोष्टीवर खर्च केला जातो. खर्चाच्या प्रमाणात उत्पन्न प्राप्ती होत नाही. परिणामी असे शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतात. हे दुष्टचक्र त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते.

**११) सरकारी धोरणे:**

अनेक शासकीय धोरणे शेती विकासास अनुकूल नाहीत. शासकीय धोरणांची अंमलबजावणी अयोग्य पद्धतीने केली जाते. शेतीसाठीचा निधी तसेच अनुदानामध्ये भ्रष्टाचार केला जातो. शेतकऱ्यांना सरकारी लाभ मिळण्यात अडचणी येतात. शेतकऱ्यांच्या जीवनावर याचा अनिष्ट परिणाम होतो. कर्जमाफी, शेती अनुदान, शेती अवजार खरेदी यासाठीच्या सोयी सवलतींचा फायदा मोठ्या तसेच मध्यम शेतकऱ्यांनाच होतो. अल्पभूधारक तसेच भूमीहीन शेतमजुर शासकीय योजनांच्या लाभांपासून वंचित राहतात. शेतीसाठी अर्थ संकल्पात अल्प तरतूद, उत्पादन खर्च ठरवण्याची चुकीची पध्दत, अत्यल्प कर्ज पुरवठा, शेतीमाल आयात निर्यातीवरील निर्बंध तसेच कर आकारणी अशी धोरणे सरकारी शेती विकासास मारक ठरतात. यामुळे शेती व्यवसायाचे नुकसान होऊन शेतकरी आत्महत्येकडे वळतो.

**१२) शेतकऱ्यांची व्यसनाधीनता:**

काही शेतकऱ्यांच्या आत्महत्येला शेतकऱ्यांची व्यसनाधीनताही कारणीभूत आहे. जुगार, मद्यप्राशन तसेच इतर व्यसनांमुळे काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून येते. घरची वाईट परिस्थिती तसेच दुःख विसरण्यासाठी अनेक शेतकरी विविध व्यसने करतात. ग्रामीण भागातील काही शेतकरी तंबाखू, गुटखा तसेच मद्यपान करतात. कौटुंबिक जबाबदाऱ्या, सततची नापिकी आणि दारिद्र्य यामुळे निराश झालेले शेतकरी मन गुंतवण्यासाठी किंवा करमणुकीसाठी म्हणून व्यसनांच्या आहारी जातात. शेतकऱ्याच्या मानसिकतेवर याचा अनिष्ट परिणाम होतो. मानसिकरित्या खच्चीकरण झालेले असे शेतकरी आत्महत्येकडे वळतात.

**१३) सामाजिक दबाव:**

भारतीत समाजव्यवस्थेत पुरुषांवर चुकीच्या सांस्कृतिक आणि सामाजिक अपेक्षांचा ताण असतो. कर्तृत्व करून दाखवणे, पैसा मिळवणे, यशस्वी होणे, कुटुंबप्रमुख म्हणून सर्व जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पडणे, पुरुषार्थ गाजवणे या अति अपेक्षांचे ओझे पुरुषांवर लादलेले जाते. यांच्या पूर्ततेसाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागतो. याचा गंभीर मानसिक तणाव त्यांच्यावर असतो. या अपेक्षांची पूर्तता न झाल्यास पदरी निराशा येते. पुरुषांच्या या अपयशाकडे समाजात सामाजिक कलंक म्हणून पाहिले जाते. या सामाजिक कलंकातूनच शेतकरी समाज आणि कुटुंबापासून तुटला जातो. असा स्वत:पासून तुटलेला शेतकरी सामाजिक दबावातून आपली जीवनयात्रा संपवतो.

**१४) शेतीस सामाजिक प्रतिष्ठा नाही:**

ग्रामीण युवक शेतीकडे संकुचित दृष्टीने पाहत आहेत. नवी पिढी शेती करण्यास उदासीन दिसून येते. शेती करणे कमीपणाचे मानले जात आहे. शेतीत अधिक काबाडकष्ट करावे लागतात. पुरेसे उत्पन्न मिळत नाही. शेतकऱ्यास समाजात मान सन्मान अथवा सामाजिक प्रतिष्ठा नाही. शेती करणाऱ्या युवकांचे विवाह होण्यातही अडचणी येतात. कोणतीही सामाजिक प्रतिष्ठा नसलेला आणि आत्मसन्मान हरवलेला शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो.

**१५) बदलत्या हवामानाचा फटका :**

बदलत्या हवामानाचा फटका शेतीला बसत आहे. हवामानातील तीव्र बदल, दुष्काळ  गारपीट, अवकाळी पाऊस, थंडी, उष्णतेच्या लाटा या घटकांचा शेतीवर अनिष्ट परिणाम होत आहे. बदलत्या ऋतुमानामुळे पिकांचे नुकसान होऊन शेतकरी दारिद्र्यात ढकलला जातो. बदलत्या हवामानात टिकू शकणाऱ्या बियाणांची निर्मिती होत नाही. उच्च प्रतीच्या बियाणांच्या किमती अधिक असतात. सर्वसामान्य शेतकऱ्यांना असे महागडे बियाणे घेणे परवडत नाही. पारंपारिक पिके बदलत्या हवामानाचा सामना करू शकत नाही. परिणामी पिकांचे नुकसान होऊन शेतकरी हतबलतेतून आत्महत्या करतो.

**१६) कर्जाचा दुरुपयोग:**

अनेक शेतकऱ्यांनी कर्जाचा वापर शेतीसाठी न करता कौटुंबिक कारणासाठी केलेला आहे. शेती अवजारे, खते, बी बियाणे, कीटकनाशके खरेदी करणे तसेच जमिनीच्या मशागतीसाठी कर्ज काढलेले कर्ज

प्रत्यक्षात मात्र मुला मुलींचे विवाह, घर, गाडी, सण, समारंभ, धार्मिक विधी तसेच आजारपण अशा अनुत्पादक गोष्टीवर केल्याचे दिसून येते. त्यामुळे घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याची क्षमता शेतकऱ्यात निर्माण होत नाही. शेती उत्पादनावर याचा विपरीत परिणाम होऊन कर्जफेड न करता आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून येते.

**इतर कारणे**

उपरोक्त कारणांसोबतच कौटुंबिक आजारपण, मुला-मुलींच्या शिक्षणाचा वाढता खर्च, शेतीसंबंधी संबंधित दावे, कोर्टकचेऱ्या, रोजगार संधीचा अभाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या, हलाखीची आर्थिक परिस्थिती, शेती आणि शेतकऱ्यांप्रतीची सामाजिक तसेच राजकीय उदासीनता अशी अनेक कारणे शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार असल्याचे दिसून येते.

**शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजना:**

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना प्रतिबंध घालणे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. शेतकरी जगाला तर समाज जगेल या भावनेतून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सर्वच पातळीवर आवश्यक त्या सर्व उपयायोजना करणे काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याचा सविस्तर अभ्यास करता येईल.

**१) शेतमालास योग्य हमीभाव देणे:**

शेतकऱ्याच्या मालाला किमान आधारभूत किंमत मिळाल्यास शेतकरी आत्महत्येला काही प्रमाणात आळा बसेल. यासाठी सरकारने शेतमालाचा योग्य हमीभाव निश्चित करणे अत्यावश्यक आहे. शेतमालासंबंधी कायदे करून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील दलालांची साखळी कमी करून प्रत्यक्ष शेतकऱ्याला फायदा होण्यासाठी ठोस यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला शेतमालाची माहिति तात्काळ उपलब्ध होण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण व्हायला हवी. शेतमालाला कायमस्वरूपी निश्चित हमीभावाची खात्री मिळाल्यास शेतकऱ्याला उत्पनाचे ठोस साधन प्राप्त होईल. किमान उत्पादन खर्च मिळून नुकसान होण्याची भीती राहणार नाही. शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारून वेळेत कर्जफेड करता येईल. शेतमालाला योग्य हमीभाव मिळाल्यास शेतकरी आत्महत्या करण्यापासून परावृत्त होईल.

**२) जलसिंचन सुविधा वाढविण्यास प्राध्यान्य:**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी जलसिंचनाच्या अनेक सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. धरणे, कालवे, थेट पाईपलाईन, तळी तसेच नद्या यांच्यामार्फत शेतीला पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र अजूनही ग्रामीण भागातील जमिनीचा मोठा भूभाग कोरडवाहू आहे. सरकारला आजही हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणता आलेली नाही. शेतीला मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक सोयी सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. पाणलोट क्षेत्राचा विकास करणे, कालवे, बंधारे घालणे, शेततळी बांधणे, विहिरी तसेच तलाव बांधून शेतीला मुबलक पाणीपुरवठा करता येईल. शेतजमीन ओलिताखाली

आल्यास शेतकऱ्याला विविध पिके घेता येतील. अधिक उत्पादनातून उत्पन्न प्राप्ती होऊन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. पर्याप्त जलसिंचनाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून शेतकऱ्यांना आत्महत्येपासून रोखता येईल.

**३) पीक विम्याची तात्काळ पूर्तता:**

नैसर्गिक आपत्ती, गारपीट, मुसळधार पाऊस, महापूर तसेच रोगराई यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. आर्थिक नुकसानीमुळे शेतकरी हतबल होतो. त्याला आर्थिक नुकसानीतून सावरण्यासाठी झालेल्या नुकसानीचा पीक विमा तत्काळ मिळायला हवा. अस्मानी आणि सुलतानी संकटामुळे झालेल्या नुकसानीतून उभारण्यासाठी सरकारकडून विशिष्ट आर्थिक मदत तात्काळ मिळायला हवी. ही नुकसान भरपाई बाजारभावाप्रमाणे असायला हवी. पीक विम्याची तात्काळ पूर्तता झाल्यास शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक हातभार लागेल. याचबरोबर बँकांचे कर्जवसुली एजंट तसेच सावकारांच्या मनमानी कर्जवसुलीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियमावली करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करणारी प्रभावी यंत्रणा निर्माण केल्यास शेतकरी आत्महत्येला प्रतिबंध बसेल.

**४) पीक नियोजन करणे:**

शेतकऱ्यांनी जमिनीच्या प्रकारानुसार पीक पध्दतीत आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी वेळोवेळी माती परीक्षण करणे गरजेचे आहे. सतत विशिष्ट पीक घेतल्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. काही पिकांना पाण्याची गरज अधिक असते. अधिक उत्पादनासाठी रासायनिक खतांचा भरमसाठ केला जातो परिणामी जमिनीचा दर्जा खालावतो. यासाठी शेतकऱ्यांनी पिकांची योग्य निवड करून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी शेतकऱ्यांना आंतरपीक पद्धती फायदेशीर ठरेल. ज्या शेतकऱ्यांकडे पाणी व जमिनीची उपलब्धता आहे त्यांना वर्षातून दोन ते तीन वेळा आंतरपिके घेता येतील. यामुळे शेतकऱ्यांना ठराविक अंतराने विशिष्ट उत्पन्न प्राप्त होऊ शकते. प्रशिक्षण, जलसिंचन सुविधा, उत्तम बी बियाणे तसेच कीटकनाशके अल्प दरात उपलब्ध करून शेतकऱ्यांना सक्षम करता येईल.

**५) सवलतीच्या दराने कर्जपुरवठा:**

शेतीच्या विविध कामांसाठी शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागते. शेतकरी बँका, पतसंस्था तसेच सावकार यांच्याकडून कर्जे घेत असतो. बँका तसेच पतसंस्थामधून कर्ज मिळवताना त्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करता येत नाही. शेतकऱ्याला नाईलास्तव सावकारांकडून अधिक व्याजाने कर्ज घ्यावे लागते. यातून तो कर्जबाजारी होऊन आत्महत्येकडे वळतो. याला प्रतिबंध घालण्यासाठी शेतकऱ्याला आवश्यक कर्ज सुलभ आणि सवलतीच्या दराने मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. बँका तसेच सरकारी संस्थाकडून कर्जाची सहज उपलब्धता झाल्यास सावकाराकडून होणारी त्यांची पिळवणूक थांबेल. यासाठी सरकारी यंत्रणांनी सकारात्मक दृष्टिकोन बाळगून

शेतकऱ्याला सहाय्य करणे गरजेचे आहे. कर्ज पुरवठ्याची व्यवस्था अधिकाधिक सक्षम करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना जगण्याचं बळ देता येईल.

**६) सुधारित कृषी पद्धतींचा अवलंब:**

शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करणे काळाची गरज आहे. दर्जेदार पिक उत्पादनासाठी सुधारित बी बियाणांचा वापर करणे, जलसिंचनाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, माती परीक्षण करून मातीच्या दर्जानुसार पिक घेणे, अधिक उत्पादनाच्या हव्यासापोटी पाण्याचा तसेच रासायनिक खतांचा अति वापर टाळणे तसेच जमीन नापीक होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी शेतीची योग्य प्रकारे मशागत करणे, प्रादेशिक हवामान, शेत जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता, बी बियाणे तसेच शेतीसाठी येणारा खर्च यांचा सांगोपांग विचार करून शेती करण्यास प्राध्यान्य देणे शेतकऱ्यांच्या हिताचे ठरणार आहे.

**७) शेतीपूरक व्यवसाय निवडीस प्राधान्य:**

शेत मालावर प्रक्रिया करणारे विविध उद्योग गाव पातळीवर सुरु आवश्यक आहे. प्रक्रिया उद्योगातून उत्पादित केलेल्या शेतमालाला स्थानिक तसेच देश पातळीवर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात यावी. शेती प्रशिक्षण, प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण, जोडधंद्याचे प्रशिक्षण तसेच प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक सोयी सवलती गाव पातळीवर पुरवण्यात याव्यात. यामुळे रोजगार निर्मितीस चालना मिळेल. लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास शेतकऱ्यांना उत्पन्नाचे विविध स्त्रोत निर्माण होतील. शेतीसोबतच दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, शेळी मेंढी पालन, रेशीम किड्यांची पैदास, पोल्ट्री फार्म इ. व्यवसायांना चालना देऊन शेतकऱ्याला रोजगार उपलब्ध होतील. शेतीपूरक व्यवसायातून उत्पन्नाचे ठोस साधन प्राप्त झाल्यास पैशाअभावी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होतील.

**८) सरकारी धोरणे शेतीस अनुकूल बनवणे:**

सरकारी पातळीवर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अनुकूल धोरणे बनवणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणाची धोरणे राबवण्यासाठी भरघोस आर्थिक तरदूत करणे गरजेचे आहे. शेतीमाल निर्यातीला प्रोत्साहन देऊन सरकारने स्थानिक मालाला परदेशी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सरकारमार्फत शेतकऱ्यांना आवश्यक शिक्षण, प्रशिक्षण तसेच शेतीसाठी उपयुक्त अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरवले जावे. रासायनिक खते, बी बियाणे, कीटकनाशके यांच्या वापराबाबत प्रबोधनात्मक उपक्रम राबवणे, भ्रष्ट यंत्रणा, दलाल, मध्यस्थ, सरकारी बाबूंच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवणे तसेच शेती मदतीची प्रक्रिया सुलभ करणे यासारखी शेतीस अनुकूल धोरणे राबवून शेती आणि शेतकरी यांचे कल्याण साधता येईल.

**९) पीक विम्याची व्याप्ती वाढवण्यात यावी**

विविध कारणांमुळे पिकांचे नुकसान होते. नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्याला पीक विम्याच्या माध्यमातून ठराविक आर्थिक मदत मिळते. भरपाई म्हणून दिली जाणारी रक्कम ही नाममात्र असते. त्यालाही

विलंब लागतो. पीक विमा काही ठराविक पिकांसाठीच मर्यादित असतो. सर्वच पिकांना नुकसान भरपाई मिळत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त पिके पिक विम्याच्या कक्षेत आणण्यासाठी शासनाने तरदूत करावी. पीक विम्याच्या व्याप्तीचे निकष बदलण्यात यावेत. पिक विमाव्दारे पर्याप्त आणि तात्काळ भरपाई मिळाल्यास शेतकऱ्याला नुकसानीच्या काळात सावरण्यास मदत होईल.

**१०) कृषी कर्जासोबत उपभोग कर्ज**

शेतकऱ्याला विविध कारणांसाठी कर्ज घ्यावे लागते. अनेक शेतकरी कर्जाचा बराच भाग शेती शिवाय इतर गोष्टींवर खर्च करतात. शेती उत्पादन आणि उत्पन्नावर याचा विपरीत परिणाम होतो. शेतकऱ्याला कर्जफेड करता येत नाही. कर्जाची रक्कम वाढून शेतकरी कर्जबाजारी बनतो. शेतकऱ्यांना शेती शिवाय अल्प व्याजात इतर कारणांसाठी उपभोग कर्ज उपलब्ध करून दिल्यास शेतीसाठी मिळणारे कर्ज शेतीसाठीच वापरले जाईल. शेती उत्पादकतेत वाढ होऊन आलेल्या उत्पन्नातून शेतकऱ्याला वेळेत कर्जफेड करता येईल. त्यामुळे बिगर शेती कारणांसाठीही कर्जाची तरतूद करता येईल का याचाही विचार होणे गरजेचे आहे.

**११) कर्जफेड निधीची उभारणी**

दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर, गारपीट तसेच रोगराई अशा नैसर्गिक कारणांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. त्याला कर्जफेड करणे अशक्य होते. थकीत कर्जामुळे नवीन कर्ज मिळत नाही. केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच सहकारी बँका यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कर्ज फेडीसाठी काही निकष ठरवून कृषी कर्जफेड निधी स्थापन करण्यात यावा. काही निकषांच्या आधारे शेतकऱ्याला व्याजमाफी तसेच कर्जमाफी देण्याची तरतूद करण्यात यावी. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात आर्थिक सहाय्य मिळाल्यास त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही.

**१२) करारशेतीला प्रोत्साहन**

बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी करार शेतीला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शेतीमाल उत्पादक आणि खरेदीदार यांच्यात करारानुसार उत्पादन आणि पुरवठा करण्याच्या व्यवस्थेला करार शेती म्हटले जाते. करार शेतीत शेतकऱ्याला किमतीची हमी मिळते. सुधारित तंत्रज्ञानाचा पुरवठा तसेच मार्गदर्शन प्राप्त होते. खरेदीदारालाही दर्जेदार उत्पादनाची हमी मिळते. शेतकऱ्याला यातून शाश्वत उत्पन्नाचे साधन प्राप्त होते. शेतकऱ्याला कर्जबाजारीपणाच्या समस्येतून बाहेर पडायला मदत होऊन शेतकरी आत्महत्येला प्रतिबंध बसेल.

**१३) समुदाय समर्थन प्रणाली निर्माण करणे:**

शेतीतील नुकसानीमुळे निराश झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक, तांत्रिक तसेच मानसिक आधार देण्यासाठी समर्थ समुदाय समर्थन प्रणाली निर्माण करणे आवश्यक आहे. महिला बचत गट, सहकारी संस्था, बिगर शासकीय संघटना, सेवाभावी संस्था तसेच शेतकरी संघटनांच्या माध्यमातून अशी प्रणाली उभी करता येईल. या प्रणालीच्या माध्यमातून शेतकरी आणि त्याच्या कुटुंबाला मानसिक आधार देता येईल. यातून

शेतकऱ्यांचे मनोबल वाढून त्यांना जगण्याचे बळ मिळेल. संकट काळात शेतकऱ्यांना मानसिक आधार देऊन आत्महत्येपासून परावृत्त करण्यास ही प्रणाली सहाय्यकारी ठरेल.

वरील उपाययोजनांच्या सक्षम अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना प्रतिबंध घालता येईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी समाज, सरकार, शेतकरी तसेच समाजातील विविध घटकांनी एकत्रित येऊन सामूहिक प्रयत्नाव्दारे शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देणे गरजेचे आहे.

## १.३ सारांश

ग्रामीण बेरोजगारीच्या समस्येने गंभीर रूप धारण केलेले आहे. त्यामुळे ग्रामीण रोजगारांच्या नव्या पर्यायांचा विचार करणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील उपलब्ध नैसर्गिक साधनांच्या नियोजनबद्ध वापरातून रोजगार निर्मिती करता येऊ शकेल. ग्रामीण बेरोजगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ग्रामीण पर्यटन क्षेत्राच्या विकासातून रोजगारच्या विविध संधी निर्माण करता येऊ शकतील. पायाभूत सुविधांच्या विकासातून हे साध्य करता येऊ शकेल. शेतीला पर्यायी क्षेत्रातून रोजगार निर्मिती झाल्यास शेतीवरील अतिरिक्त ताण कमी होईल. शेतीपूरक व्यवसायातून उत्पन्न प्राप्ती करता येईल. दरवर्षी कृषी क्षेत्रातील अरिष्ट्यांमुळे होणाऱ्या हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना काही प्रमाणात प्रतिबंध बसेल. कृषी क्षेत्राला पाठबळ देऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

रिकाम्या जागा भरा.

१) भारतीय शेती............ स्वरूपाची आहे.

अ) शाश्वत ब) हंगामी क) मोसमी ड) ग्रामीण

२) ग्रामीण समाजातील व्यक्तीला रोजगार प्राप्तीसाठी.......... आव्हानांचा सामना करावा लागतो?

अ) शिक्षणाचा अभाव ब) रोजगार संधींचा अभाव

क) लोकसंख्या वाढ ड) वरील सर्व

३) ........... ही सरकारी योजना मुख्यतः ग्रामीण रोजगारीवर लक्ष केंद्रित करते?

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)

ब) प्रधानमंत्री जन धन योजना

क) प्रधानमंत्री आवास योजना

ड) राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा

४) ग्रामीण भागात सर्वाधिक रोजगार निर्माण करण्याची क्षमता ........... क्षेत्रात आहे?

अ) शेती ब) सेवा क) उत्पादन ड) बांधकाम

५) ............ कौशल्य विकास योजना ग्रामीण युवकांशी संबंधित आहे?

अ) दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (डीडीयू-जीकेवाई)

ब) राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन (एनएसडीएम)

क) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (पीएमकेव्हीवाई)

ड) वरील सर्व

६) ............ ग्रामीण पर्यटनाचे मुख्य उद्दिष्ट आहे?

अ) शहरी विकास ब) ग्रामीण विकास क) औद्योगिक विकास ड) तंत्रज्ञान विकास

७) खालीलपैकी .......... हा ग्रामीण पर्यटनाचा घटक नाही?

अ) सांस्कृतिक पर्यटन ब) साहस पर्यटन क) शहरी पर्यटन ड) कृषी पर्यटन

८) ग्रामीण पर्यटनात .............. अपेक्षित नाही?

अ) उत्पन्न वाढ ब) पायाभूत सुविधा सुधारणा

क) संस्कृतीचे संवर्धन ड) प्रदूषण वाढ

९) सामाजिक विकासात ग्रामीण पर्यटन ............. व्दारे योगदान देते?

अ) व्यक्तीवादास चालना ब) असमानता वाढवून

क) समुदायिक एकते ड) सांस्कृतिक देवाणघेवाणीत अडथळा

१०) ग्रामीण पर्यटन सांस्कृतिक वारसा जपण्यात ........... मदत करू करते?

अ) संस्कृतीच्या व्यापारीकरणातून ब) स्थानिक परंपरांकडे दुर्लक्ष करून

क) वास्तविक अनुभवांच्या प्रोत्साहनाव्दारे ड) पर्यटकांच्या पर्यटनात खंड पाडून

११) ग्रामीण पर्यटन शाश्वत विकासात............ व्दारे योगदान देऊ शकते?

अ) नैसर्गिक संसाधनांच्या शोषणाव्दारे ब) पर्यावरणपूरक पद्धतींच्या प्रोत्साहनाव्दारे

क) स्थानिक समुदायांकडे दुर्लक्ष करून ड) अल्पकालीन फायद्यांव्दारे

१२) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मुख्य कारण ........... आहे?

अ) अल्प शेती उत्पादन ब) कर्जबाजारीपणा क) सरकारी मदतीचा अभाव ड) वरील सर्व

१३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी .......... दीर्घकालीन उपाय नाही?

अ) कर्जमाफी ब) पिकांतील विविधता

क) बाजारपेठेचे संबंध सुधारणे ड) शाश्वत शेती पद्धती

१४) देशात सर्वाधिक आत्महत्या .............. राज्यात झालेल्या आहेत.

अ) आंध्रप्रदेश ब) महाराष्ट्र क) तामिळनाडू ड) कर्नाटक

१५) शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणास .......... घटक कारणीभूत आहेत.

अ) अधिक उत्पादन खर्च　　　　　　　　ब) कमी उत्पादन

क) नैसर्गिक आपत्ती　　　　　　　　ड) वरील सर्व

१६) बदलत्या हवामानामुळे शेती उत्पादनात ........... होते.

अ) वाढ　　　ब) घट　　　क) वृद्धी　　　ड) नफा

१७) समुदाय समर्थन प्रणाली शेतकऱ्यांना ............ साठी मदत करू शकते?

अ) उत्पादन वाढीसाठी　　　　　　　　ब) कर्ज परतफेडी

क) मानसिक आधारासाठी　　　　　　　　ड) जमिनीच्या मशागतीसाठी

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) हंगामी　　　२) वरील सर्व

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)

४) शेती　　　५) वरील सर्व　　　६) ग्रामीण विकास　　　७) शहरी पर्यटन

८) प्रदूषण वाढ　　　९) सामुदायिक एकते　　　१०) वास्तविक अनुभवांच्या प्रोत्साहनाव्दारे

११) पर्यावरणपूरक पद्धतींच्या प्रोत्साहनाव्दारे　　　१२) वरील सर्व

१३) कर्जमाफी　　　१४) महाराष्ट्र　　　१५) वरील सर्व

१६) घट　　　१७) मानसिक आधारासाठी

## ४.६ सरावासाठीचे प्रश्न

सविस्तर उत्तरे लिहा.

१) ग्रामीण भागातील उपलब्ध रोजगारांच्या निरनिराळ्या संधी विशद करा.

२) ग्रामीण रोजगार प्राप्तीतील विविध आव्हानांची सविस्तर चर्चा करा.

३) ग्रामीण पर्यटनाचा अर्थ सांगून ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती स्पष्ट करा.

४) ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व विस्तृतपणे विशद करा.

५) आत्महत्येचा अर्थ सांगून शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार कारणांची चर्चा करा.

६) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना सविस्तर लिहा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. बिरादार माधव (२०१८), 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

२. आगलावे प्रदीप आणि आगलावे सरोज (२०१८), 'भारतातील सामाजिक समस्या', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. किर्दक बी.एच., खडके सुधा आणि पांडे दया (२०१८), 'भारतीय सामाजिक समस्या', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

४. पैठणे ए. एस., जावळे साधना आणि कोल्हे वृषाली (२०१४), 'भारतीय समाजः प्रश्न आणि समस्या', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

५. भोसले, के., एम., भोसले एस., एस., कदम एच. पी. (२०१८), 'भारतीय अर्थव्यवस्था', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. गोरे अशोक (२०१५), 'भारतीय सामाजिक समस्या', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

७. बोकरे दिवाकर (२००८), 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या कशा?' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

८. बनकर अनिल (संपा.) (२०१२), 'ग्रामीण समाज आणि ग्रामीण विकासाचे उपक्रम', दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

९. शिंदे बी. एस. (२०११), 'पर्यटन भूगोल', फडके प्रकाशन, कोल्हापूर

१०. सांगळे शैलजा (२०२४), 'पर्यटन भूगोल', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

११. ॲग्रो टुरिझम वेबसाईट, ≤https://agrowon.esakal.com/

१२. मनोज जगताप (२०२४), 'महाराष्ट्र वार्षिकी, बदलते कृषी अर्थकारण आणि महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांची समस्या', पान. नं. १०७-११५, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे

❑❑❑